छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण, शके १९३६ । वर्ष १५ अंक ३
वार्षिक वर्गणी ₹ १८०/मूल्य ₹ १५



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक!

नमस्कार देवा...

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।। ध्रु. ।।

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी
अशा सर्व स्वप्नास सामर्थ्य यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
अम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी
तयांच्या कळा जाणवाव्या अम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।

स्फुरो कल्पनाशक्ती अभ्यास यत्ने
बनो शुध्द बुध्दी हि तेजस्विनी
शरीरास आरोग्य संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी
पदी धैर्य बाहूत शौर्य स्फुरावे
घडावी विवेकी कृती ध्यास हा ।। ३ ।।

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणुरेणु ब्रह्मांड तू व्यापिले
तुझे अंश आम्ही तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले
पुन्हा जन्म घेऊ स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।

छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण, शके १९३६। वर्ष १५ अंक ३

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २६९ वा अंक, वर्ष २३ अंक ५

प्रकाशन दिनांक – सौर १० अग्रहायण, शके १९३६/१ डिसेंबर २०१४

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

४.	**संवाद**	– महेन्द्र सेठिया
५.	कथा ... **काडी पेहलवान झाले हनुमान**	– डॉ. लीला दीक्षित
९.	माहितीपर... **बहुउपयोगी आजीचा बटवा**	– डॉ. कांचनगंगा गंधे
१२.	कविता... **चालत राहा**	– डॉ. विनय अपसिंगकर
१३.	माहितीपर... **सागर शिंपले**	– नरेन्द्र नायडू
१५.	व्यक्तिविकसन... **संघर्ष आणि जिद्दीला सलाम !!**	– सुरेंद्र पाटसकर
१८.	**विज्ञान प्रयोग**	– संकलित
१९.	एकांकिका...**वेडं वय**	– शिल्पा कुलकर्णी
२५.	लेखमाला... **समस्या परिहार...** (लेखांक ५) **अडचण आणि समस्या यातील सीमारेषा**	– संहिता करमळकर
२७.	मुलांचे पान.. **आणि आम्ही देखील पेब सर केला...**	– चि. कौस्तुभ सामंत
	भाकरीचं मोल	– चि. शार्दूल फाटक
३०.	कविता... **थंडी**	– प्रदीप आवटे
३१.	ललित... **मातीचं माहेर**	– सुनील शिनखेडे
	मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **नमस्कार देवा**	– अशोकराव निरफराके, विनयराव हर्डीकर

याशिवाय– जरा डोकं चालवा (८), अद्भूत कृमीने दिले नोबेल पारितोषिक ! (११), सुशोभन मिठाई बॉक्सचे !! (१७), स्पर्धा निवेदन (२४), प्रतिसादी वाचकवीर व्हा...८, मन:पूर्वक अभिनंदन, शब्द एक क्रियापदे अनेक, छात्र प्रबोधन वर्गणीतील बदल (३४)

या अंकातील पानाखालील ओळी थंडीशी निगडित आहेत.

तळटिपेतील ओळी – भारतातील रॅमन मॅगसेसे पुरस्कारप्राप्त व्यक्ती. (१९५८ ते १९९६)

मुखपृष्ठाविषयी

हे चित्र साकारताना पेन्सिल व जलरंग या माध्यमांचा वापर केला गेला आहे. हे चित्र कल्पनाचित्र (Conceptual Art) या प्रकारामध्ये मोडते. चित्रातील हा मुलगा परिस्थितीचा गांभीर्याने पण सकारात्मक विचार करत आहे.

– कुडल हिरेमठ

♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦
महेन्द्र सेठिया

♦ कार्यकारी संपादक ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ संपादक मंडळ ♦
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

♦ मुखपृष्ठ ♦
कुडल हिरेमठ

♦ आतील चित्रे ♦
अंजली पुरंदरे, तेजस्वी भुरके

♦ संपर्क पत्ता ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org

ई–मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

मासिकाची वर्गणी
वार्षिक: ₹ **१८०**, द्वैवार्षिक: ₹ **३४०**,
त्रैवार्षिक: ₹ **५००**,
दशवार्षिक: ₹ **१,५००**.
या अंकाची किंमत : ₹ १५
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी– ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : विनोबा भावे (१९५८) - समाजकार्य

संवाद

प्रिय प्रबोधकांनो,

दिवाळी अंक वाचला का ? त्यातलं काय–काय भावलं, आवडलं? काय काय करून पाहिलं? आम्हाला कळवाल का? आणि एक दोन तरी लेखकांना आवर्जून पत्र पाठवा. तुमच्या प्रतिसादाने आमचा आणि लेखकांचाही हुरूप वाढतो, बरं का ! तेव्हा प्रतिसादी व्हा !! दिवाळीच्या सुट्टीत काय–काय केलंत? काय विशेष लक्षात राहाण्याजोगे अनुभव घेतलेत? तुमचे खास अनुभव/तुम्ही केलेली धडपड वाचायला/ऐकायला मनापासून आवडतील.

या सुट्टीत मी प्रबोधिनीतील एका गटासोबत मेळघाट (जि. अमरावती) येथे गेलो होतो. तेथील जनजीवन समजून घेणं, तेथील मुलांची शिबिरं घेणं आणि तेथील प्रश्नांवर काम करत असलेल्या कार्यकर्त्यांबरोबर राहून त्यांचे कार्य समजून घेणं; हा आमचा तिथे जाण्यामागचा उद्देश होता. अमरावतीत जिल्हाधिकारी श्री. किरण गित्ते यांची भेट घेतली. आम्ही त्यांच्याकडून मेळघाटची सद्यस्थिती समजून घेतली. सामाजिक कार्यकर्ते डॉ. अविनाश सावजी यांच्याशी गप्पागोष्टी झाल्या. तेथून सुमारे ६–७ तासांचा प्रवास करून मेळघाटातील अतिदुर्गम भागातील 'हाथरु–चिलाटी' या गावांमध्ये आम्ही पोहोचलो. तेथे 'मैत्र' या संस्थेतर्फे 'मेळघाट मित्र' या नावाने शिक्षण, आरोग्य, शेती, समाज–प्रबोधन, युवा प्रबोधन या विषयांवर स्थानिक गावमित्र व आरोग्यदूतांमार्फत चालू असलेलं काम समजावून घेतलं, तर आसपासच्या ३ गावांमध्ये जाऊन, तेथील मुला–मुलींना गोळा करून त्यांचं (विज्ञान प्रयोग, हस्तकौशल्ये, खेळ, गाणी–गोष्टी इ.) शिबिर घेतलं. त्यांच्याशी व त्यांच्या घरात जाऊन त्यांच्या कुटुंबियांशी गप्पा मारल्या. त्यातून तेथील परिस्थिती, त्यांच्या चालीरीती, सण–उत्सव, समस्या जाणून घेतल्या. मेळघाट हा सगळा आदिवासी भाग. त्यातही 'कोरकू' समाज बहुसंख्य! भाषा कोरकू; पण हिंदी बऱ्याच जणांना समजतं ! काळीभोर शेतजमीन अन् ६–६ फूट उंच तरारलेली मोठ्या दाण्यांनी भरलेली ज्वारी ! नैसर्गिक सुबत्ता खूप; पण दुर्गमतेमुळे शिक्षण, आरोग्य, रोजगार, दळणवळणाची साधने, वीज, रस्ते या मूलभूत सुविधांपासूनही वंचित ! तेथील मुलामुलींनी म्हटलेली कोरकू गाणी, अचंबित करणारी त्यांची ग्रहण क्षमता, बुद्धिमत्ता आणि त्यांनी काढलेली सुंदर चित्रे आम्हाला थक्क करून गेली. तेथून आम्ही डॉ. स्मिता कोल्हे व डॉ. रवींद्र कोल्हे यांच्याकडे बैरागडला (मेळघाटचे दुसरे टोक) गेलो. (आपल्या दिवाळी अंकात त्यांच्यावरचा लेख वाचला का?) त्यांचे संघर्षाचे अनुभव ऐकताना आम्ही स्तिमित झालो. स्मितातार्इंबरोबर आम्ही तापी नदीवर जाऊन आलो. मग उतावली (ता. धारणी) येथे डॉ. आशिष व डॉ. कविता सातव यांची भेट घेतली. त्यांचे आरोग्यविषयक चालू असलेलं काम पाहिलं. लवादा येथे श्री. सुनील देशपांडे यांच्या संपूर्ण बांबू केंद्रात राहिलो. त्यांनी रोजगार निर्मितीसाठी बांबूचा घर बांधणीपासून ते कलात्मक वस्तू तयार करण्यापर्यंत केलेला वापर थक्क करणारा होता. परतीच्या प्रवासात परतवाडा येथे 'खोज' संस्थेचे श्री. बंडू साने व अन्य कार्यकर्त्यांशी गप्पागोष्टी झाल्या. सरकारी योजना कार्यान्वित होण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाच्या अनेक घटना व न्यायालयीन लढाया ऐकायला मिळाल्या. अमरावती येथे छात्र प्रबोधनचे वितरण केंद्र सांभाळणारे कुलकर्णी, व्यवहारे व अन्य कार्यकर्ते यांनी मेळघाटला जाताना व पुण्याला परतताना अत्यंत आत्मीयतेनं केलेलं स्वागत, पाहुणचार खूपच भावला.

या प्रवासात आम्ही निसर्गाची विविध रूपे तर पाहिलीच; पण तिथली माणसं पाहिली, ती काही प्रमाणात वाचता आली. सामान्यातल्या सामान्य माणसापासून, कार्यकर्ते – अधिकाऱ्यांपर्यंत आणि ७–८ महिन्यांच्या मुलापासून ते ८० वर्षांच्या वृद्धांपर्यंत अनेकांशी गप्पा झाल्या. भाषेपलीकडचं नातं मनाला भिडलं. त्याने आम्ही अधिक समृद्ध झालो. मला असं वाटतं, की तुम्हीही जेव्हा–जेव्हा प्रवास–भटकंतीला जाल; तेव्हा–तेव्हा निसर्गस्थळे, तीर्थक्षेत्रे, विज्ञानतीर्थे, ऐतिहासिक प्रेरणास्थाने, तर आवर्जून पाहाच; पण त्याचबरोबर तेथील माणसे पाहा, त्यांच्याशी गप्पा मारा, त्यांची सुखदु:खं समजून घ्यायचा प्रयत्न करा. मला खात्री आहे; तुमची भटकंती तुम्हालाही अधिक समृद्ध करणारी, दीर्घकाळ लक्षात राहणारी होईल.

हा अंक तुमच्या हातात पोहोचेल, तेव्हा थंडीही तुमच्यापर्यंत पोहोचली असेल. जाडजूड रजईत उन्हं वर येईपर्यंत झोपून राहण्याचा आनंद केव्हातरी जरूर घ्या; पण त्याहीपेक्षा रजईतून बाहेर पडून मनसोक्त व्यायाम करण्याचा आनंद तुम्ही जास्ती वेळा मिळवावा. शरीर धष्टपुष्ट करण्याचा हिवाळा हा सर्वोत्तम काळ ! तेव्हा सर्वांगीण व्यायाम, सकस–आहार आणि त्यातून मिळालेल्या ऊर्जेतून विविध स्पर्धा, क्रीडा महोत्सव, स्नेह संमेलने यांमध्ये उत्साहाने, पुढाकाराने सहभाग ही त्रिसूत्री लक्षात ठेवा आणि त्याप्रमाणे कार्यवाही करा. त्यासाठी तुम्हाला मनापासून शुभेच्छा !

तुमचा दादा,

(महेन्द्र सेठिया)

शेत आले हुरड्यास भात पिवळा सोनेरी। मुठी भरून धान्याच्या रोपे नाचती शिवारी।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : चिंतामणराव देशमुख (१९५९) - सरकारी सेवा

प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे – दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

काडी पेहलवान झाले हनुमान

– डॉ. लीला दीक्षित

सौरभ यंदा कोकणात जायचं म्हणून हरखला होता. त्याच्याबरोबर त्याच्या कॉलनीतला सुहासपण असणार होता. अरुणाआत्या म्हणजे सौरभची आई. तिनंच सुहासच्या आईला विचारलं,

''हे पाहा, सुहासला कोकण पाहायचंय ना? पाठवा त्याला आमच्याबरोबर. पुढच्या आठवड्यात मी जाणार आहे. खूप मित्र मिळतील सुहासला तिथं.''

सुहास खूष झाला. एस. टी.चं *रिझर्वेशन* झालं. सुहास, सौरभ आणि अरुणाआत्या साखरीआगरला निघाली. साखरी आगर तसं छोटं गाव. सारी मिळून हजार वस्ती; पण गाव मात्र सुंदर. डोंगरावरून पोवईच्या वडावरून सरळ गेलं, की साखरीआगर. मागच्या बाजूला समुद्रकिनारा.

आजोबांचं घर म्हणजे गोकुळ. आजोबांच्या तीनही मुली अरुणा, करुणा आणि वरुणा माहेरपणाला त्यांच्या मुलाबाळांसकट हजर होत्या. त्याशिवाय सुधाकरमामाचा प्रथमेश आणि प्रणिता. रघूमामाची रमा आणि राघव. त्याशिवाय शेजारच्या मुलांचा पाच–सात समवयस्क मुलांचा चमू जमायचा. सारी मिळून बारा पंधरा मुलं दुपारभर धुमाकूळ घालायची. या साऱ्यांमध्ये सुहास मात्र वेगळा होता. तो फारसा खेळायचा नाही. थोडं खेळला, की आजोबांजवळ येऊन बसायचा आणि म्हणायचा,

''आजोबा मी दमलो.'' आणि झोपून जायचा.

आजोबा अरुणाआत्याला म्हणाले,

''काय गं, अरुणा तुझ्या मैत्रिणीचा हा मुलगा असा कसा काडी पेहलवान?''

''तेच तर सांगत्येय ना बाबा; माझ्या मैत्रिणीला–उमाला, हीच काळजी लागलीय. कसा सुधारणार हा? जरा खेळलं की दमतो.''

''सुहास व्यायाम करत नसावा. आता दीड महिना सुट्टी आहे ना शाळेला. मी पाहातो त्याच्याकडे,'' आजोबा म्हणाले.

तेवढ्यात सुहास म्हणाला,

''आजोबा पण मी जाणार अरुणाआत्याबरोबर पुण्याला? मला कुणी खेळायला घेतच नाही.''

''तुला कसं घेणार?'' आजोबा बोलत असतानाच सौरभ व त्याचे सारे मित्र आले.

राघव म्हणाला,

''आजोबा त्याला कसं घेणार? काल खो–खो खेळताना हा सारखाच *आऊट* होत होता. याला जोरात पळता येत नव्हतं.''

''राघव असं नाही करायचं. त्याला खेळायला घ्यायचं. त्याला आता लवकरच मी हनुमान बनविणार आहे,'' आजोबा म्हणाले.

सुहास खुदकन हसला अन् म्हणाला,

''आजोबा हनुमान म्हणजे पेहलवानच की, खरंच तुम्ही बनवाल मला हनुमान?''

क्षितिजावर पडले इंद्रधनुचे कडे। चमचमती तृणावर नील, पाचुचे खडे।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : अमिताभ चौधरी (१९६१) - पत्रकारिता, साहित्य, कला

प्रायोजक - बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे

''हनुमान बनण्यासाठी माझं ऐकायला मात्र हवं,'' आजोबा म्हणाले.

दुसऱ्या दिवशी सौरभ, राघव आणि सारी मुले साडेपाचला उठली. परंतु सुहास काही अंथरुण सोडायला तयारच नव्हता. शेवटी आजोबांनी त्याला उठवलंच आणि अंगणात नेऊन उभं केलं. सुहासचा नाईलाज झाला. त्यानं तोंड धुतलं. बूट घातले. अरुणाआत्यानं दुधाचा ग्लास पुढे ठेवला तो बाजूला करत सुहास म्हणाला,

''आजोबा एवढं नको. मी अर्धा ग्लासच पितो.''

अर्धा ग्लास दूध कसंबसं पीत सुहास बूट-मोजे घालून रडतकढत निघाला फिरायला. घरापासून पोवईच्या वडावर जायला चांगला चढ होता. थोडंसं चढल्यावर सुहास रस्त्याच्या बाजूच्या कट्ट्यावर मटकन खालीच बसला.

सारी मुले हसली. 'बसले रडत राऊ' म्हणाली.

आजोबांनी डोळे मोठे करीत म्हटले,

''मुलांनो, सुहास आपल्याकडे पाहुणा आलाय, त्याला असं बोलायचं? राघव तू मोठा आहेस ना?''

सारी मुलं गप्प बसली. आजोबा म्हणाले, ''सुहास, तू दम खा. सारी मुलं पुढे जाऊन येतील. मी थांबतो तुझ्या जोडीला.''

सुहासला आनंद झाला. आजोबांनी बाटलीतलं पाणी सुहासला दिलं. पाणी पिऊन तो जरा तरतरला.

आजोबा म्हणाले,

''सुहास तुला काही एकदम असं चालता येणार नाही; पण पन्नास पावले तू रोज चालायचंस. अशी पन्नास पावलं चार दिवस चालल्यावर तुला आत्मविश्वास येईल. मग चार दिवसांनी परत पुढचा टप्पा.

''म्हणजे पुढची पन्नास पावलं ना?''

''सुहास पटतंय ना तुला?''

''हो आजोबा. मी प्रयत्न करीन.''

''सुहास जमेल ते तुला. तुझा दम खाऊन झाला असेल तर चला आज पन्नास पावलं.''

सुहास उठला. आजोबांनी त्याचा हात धरला. आजोबांच्या हातात काठी होती. ते हळूहळू चालत होते. दहा-पंधरा पावलांनी सुहासचा वेग वाढला. त्याला बऱ्यापैकी घाम आला.

''आजोबा, या दगडावर आपण बसू या,'' सुहास म्हणाला.

दोघंही विसावले. सकाळचा प्रसन्न वारा सुटला होता. सूर्य क्षितिजावर डोकावू लागला होता. उन्हाळ्याचे दिवस असल्यानं दिवस लवकरच उगवे. सारी मुलं पोवईच्या वडापर्यंत जाऊन परत आली. आजोबा आणि सारी घरी परतली. मित्रमंडळी घरी गेले. आणि घरातील मुलं हातपाय धुवून मागच्या पडवीत झोपाळ्यावर झुलू लागली.

सौरभ म्हणाला,

''आई आज नाश्त्याला काय?''

''आज दही पोहे,'' आजी म्हणाली.

सारी गोल बसली. प्रत्येकाच्या हातात आजीनं दहीपोह्याचा हिरवागार केळीच्या पानाचा द्रोण दिला. साईचं थोडं दही, भरपूर दूध, खोबरं व तूप-जिऱ्याची फोडणी आणि खास कोकणातली मिरची. बेत झकास जमला होता. आजोबा खुर्चीत बसून नाश्ता करत होते. सारी मुलं ताव मारीत होती. अरुणा आत्यानं सुहासचा द्रोण निम्माच

थंडीमध्ये मारव्याचे एकाकी स्वर, मावळतीला सूर्याचा अस्त। बावरलेली संध्याकाळ, गारवा लपेटत व्यस्त।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : मदर टेरेसा (१९६२) - शांततेसाठी

प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका

भरला होता. त्यानं द्रोण संपवला. आणि म्हणाला,

‘‘अरुणाआत्या मला आवडले पोहे. मला अजून हवेत.’’

‘‘वा! वा! सुहास भूक लागली तुला? किती घालू?’’

‘‘अजून द्रोण भरून,’’ सुहास म्हणाला.

आजोबा म्हणाले, ‘‘छान छान. सुहास चांगलं भरपूर खाल्लं, व्यायाम केला की बघच किमया.’’

‘‘आजोबा कसली किमया? आम्हालाही सांगा,’’मुलांनी गलका केला.

सुहास हसला. म्हणाला, ‘‘किमया? नाही सांगणार आमची गम्मत आहे ती !’’

सुहासमध्ये बऱ्यापैकी बदल होत होता. त्याचा आहार सुधारत होता. पोवईच्या वडापर्यंत तो अजून पोहोचला नव्हता; पण आजोबांची खात्री होती की चढ नसलेल्या रस्त्यावर तो चांगला चालू शकेल. साखरीआगर ते वेळणेश्वर तसं जवळ होतं. पहिला रस्ता सरळ होता. चढउतार नव्हता. आजोबांनी चार दिवसांनी मुलांना घेऊन वेळणेश्वरला जायचं ठरवलं. मुलं खूष झाली.

आजीनं नाश्ता बरोबर दिला. दडपेपोहे आणि सांजोऱ्यांनी डबे भरले. चमचे, खायला द्रोण पत्रावळी, प्यायला पाणी, सारा जामानिमा घेऊन मंडळी निघाली. एक तासात रमत-गमत वेळणेश्वरला पोहोचली. मुलंच ती; त्यांची लगेच हुंदडायला सुरुवात झाली.

आजोबा वेळोबाच्या पुढच्या कट्ट्यावर बसले. त्यांचं सुहासकडे लक्ष होतं. अंगणातील उंच पायऱ्या हात टेकून उतरणारा सुहास, आज मात्र व्यवस्थित गडगे चढून उडी मारून उतरत होता. सारी मुलं वेळोबाच्या मागच्या बाजूला समुद्र आहे तिथे गेली. वेळणेश्वरचा समुद्र सुंदर आहे. त्याची वाळू आहे पांढरीशुभ्र.

सौरभ म्हणाला,

‘‘हा वेळणेश्वरचा समुद्र दुधाचा होता का हो?’’

‘‘दुधाचा समुद्र? वेड लागलंय का तुला?’’ सारी मुलं ओरडली. सौरभ चिडला,

‘‘हसू नका. ‘दुधाचा समुद्र’ नावाचं मी पुस्तक वाचलंय बच्चंमजी!’’

आजोबा म्हणाले,

‘‘अशी एक लोककथा आहे खरी. या लोककथांची एक गम्मत आहे, त्यामधून माणसानं चांगलं वागावं, असा त्या बोध देतात.’’

‘‘मग आजोबा, सांगा ना ती लोककथा.’’ मुलं म्हणाली.

‘‘ऐका तर. एक शिवभक्त होता. त्याचं नाव होतं वेळोबा. त्याचा सारखा मुक्काम समुद्रावरच. रोज वाळूची लिंगे करून तो ध्यान करायचा. एकदा सर्वत्र दुष्काळ पडला. लोकांना खायला नाही. माणसं, गुरं- ढोरं मरू लागली. वेळोबाचं मन विदीर्ण झालं. तीन-तीन दिवस अन्न पाण्यावाचून तो अनुष्ठानाला बसला. एक दिवस पहाटे भगवान शंकर त्याच्या स्वप्नात आले. आणि म्हणाले,

‘‘तू लोकांसाठी तळमळतो आहेस. हे पाहून मी प्रसन्न झालो आहे. हा समुद्र दुधाचा होईल आणि



वाळू होईल गव्हाचे पीठ. लोकांचे पोट याने भरेल; पण एक अट आहे. ती अशी, की याचा साठा कुणी करू नये. केला तर त्याचे कटू फळ मिळेल.

वेळोबानं सकाळी पाहिलं तर खरंच समुद्र दुधाचा आणि किनाऱ्यावर पीठाच्या राशी पडल्या होत्या. बातमी गावात पोहोचली. सर्वांना वेळोबानं वरील अट सांगितली. त्यामुळे एका दिवसापुरते अन्न म्हणून दूध नी पीठ न्यायचे.

माणसे खूष झाली. गावाहून माणसं येऊ लागली. एका व्यापाऱ्याच्या मनात पाप आलं. त्यानं बैलगाडीत पीठाची पोती भरली आणि हंड्यात दूध. व्हायचं तेच झालं. माणसाच्या हावरटपणाचं फळ त्याला मिळालं.''

आजोबांनी गोष्ट अगदी रंगवून सांगितली.

''आजोबा आता रोज तुम्ही गोष्ट सांगायची आम्हाला.''

''ते काम आजीचं,'' आजोबा हसून म्हणाले.

साऱ्यांनी नाश्ता केला. आणि रमतगमत घरी आले, तोपर्यंत जेवायचीच वेळ झाली होती.

कोकणात म्हणजे रोज आमरस पोळीचं जेवण. आजोबांनी सुहासचं पान आपल्या शेजारी मांडायला सांगितलं होतं. त्यांचं सुहासकडे बारीक लक्ष असे.

एक वाटी रस रडतखडत खाणाऱ्या सुहासनं आज वाटीभर रस मागून घेतला.

दीड महिना केव्हाच गेला. सुहास ओळखू येणार नाही इतका सुधारला. सुहासचे आई-बाबा मुलांना पुण्याला घेऊन जायला आले होते. शाळा लवकरच सुरू होणार होती. दारात पाठमोऱ्या सौरभला पाहून उमाताई म्हणाल्या,

''सौरभ, सुहास कुठाय?''

मुलानं पाठ वळवली आणि उमाताई चकीतच झाल्या.

''अरे सुहास तू? ही किमया कशी झाली?''

''मला वाटलं सौरभच आहे हा!!''

''आई ही किमया आजोबांनी केली.''

आजोबा म्हणाले, ''मी काही केलं नाही. हळूहळू व्यायामाचा सराव, उत्तम सकस अन्न, भरपूर चालणं, खेळणं आणि आनंदी राहाणं यामुळे घडलं हे. 'सुहासला हनुमान बनविणार' असं मी सुहासला सांगितलं होतं. त्यासाठी सुहासनं चिकाटीनं प्रयत्न केले.''

''खरंच काडी पेहलवान आमचा सुहास हनुमान बनला...,'' सुहासचे बाबा हसत म्हणाले. उमाताई आणि त्यांच्या डोळ्यांत आनंद ओसंडत होता.

•••

- डॉ. लीला दीक्षित
४९-२, ध्रुव, सहजानंद सोसायटी,
कोथरूड, पुणे ४११०२९

जरा डोकं चालवा...



शेजारी दिलेल्या ६ चौकोनांच्या रचनेत वापरला गेलेला नियम ओळखा. A ते F या चौकोनांपैकी कोणत्या चौकोनास तो नियम लागू होतो?

उत्तरे अन्यत्र

तरंगत तरंगत धुके भुईवर आले। जिथे जिथे अवसर तिथे दाटून राहिले।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : व्हर्गिस कुरियन (१९६३) - समाजकार्य

प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे

बहुउपयोगी आजीचा बटवा

– डॉ. कांचनगंगा गंधे

टि.व्ही.वर महागडे साबण, शाम्पू इ. अनेक प्रकारच्या जाहिराती तुम्ही पाहत असाल. ती उत्पादनं तुम्हाला विकत घ्यावीशी वाटतही असतील. पण त्वचा तजेलदार राहाण्यासाठी, केसांना चमक येण्यासाठी, सर्दी पडशासारख्या आजारावर उपाय म्हणून, एकूणच संपन्न आरोग्यासाठी घरच्या घरी उपलब्ध, किफायतशीर, उपायकारक असा 'आजीचा बटवा' तुमच्या मदतीसाठी सदैव तत्पर असेल तर...? जाणून घेऊया त्या बटव्यातील खजिन्याविषयी...

कडुलिंब – बाजारात मिळणाऱ्या आयुर्वेदिक साबणामध्ये कडुलिंबाचा वापर करतात. त्यामुळे त्वचा स्वच्छ निरोगी राहाते. त्वचेचे सर्व विकार म्हणजे लाल पुरळ, चेहऱ्यावरची मुरमं नाहीशी होऊन त्वचेवरची छिद्रं मोकळी होतात. त्वचेला शुद्ध हवा मिळते आणि त्वचा तजेलदार होते. तुम्ही कडुलिंबाचा पाला-रस रोज अंगाला चोळा, बघा काही दिवसांतच तुमची त्वचा तजेलदार

कडुलिंब

दिसायला लागेल. म्हणजे तुम्ही अगदी गोऱ्यापान दिसणार नाही; पण तुमचा चेहरा नक्कीच प्रसन्न, सतेज दिसेल. कडुलिंबाचा पाला फक्त सतेज दिसण्यासच उपयोगी पडतो असं नाही, तर त्याचे इतरही बरेच औषधी गुणधर्म आहेत. पोटात जंत झाले तर पानांचा रस काढून एक चमचा रसात थोडा (अगदी चिंचोक्याएवढाच) गूळ घालून तीन दिवस प्यायल्यास जंत बाहेर पडतात. मात्र, रोज ताजा रस काढून घेतला तर तो जास्त फायदेशीर ठरतो. अंगाला खाज सुटत असेल तर पानाचा रस सर्व अंगाला लावावा किंवा आंघोळीच्या गरम पाण्यात दहा-बारा कडुलिंबाची पानं ठेचून घालावी. आपल्या मराठी वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजे गुढीपाडव्याला कडुलिंबाची पानं पाण्यात टाकून त्या पाण्यानं आंघोळ करावी, असं शास्त्रात सांगितलं आहे. एवढंच नव्हे, तर फुलं कडू असली तरी फुलाची गूळ घालून चटणी खावी असाही प्रघात आहे. कारण त्यामुळे शरीरातली कडकी बाहेर पडते अन् आरोग्य चांगलं राहातं. शिवाय पोटही साफ राहातं ! तुम्हाला ताप आल्यास सकाळ-संध्याकाळ कडूलिंबाच्या सालीचा काढा घ्या. ताप उतरायला मदत होईल.

कडुलिंबाची पानं जखमेवर कुटून लावल्यास जखम लवकर बरी होते. निंबोण्यांचं तेलही औषधी आहे. रक्त दूषित झाल्यास त्वचेवर डाग पडतात, तेव्हा हे तेल लावा. असे अनेक औषधी गुणधर्म कडुलिंबामध्ये आहेत. या झाडाची साल, मुळं, पानं, बिया सर्वच औषधी आहेत.

गवती चहा – तुम्हाला ताप आला, सर्दी झाली तर गवती चहा, तुळस, आलं घालून त्यात खडीसाखर टाकून आई काढा करून देत असेल. हा गवती चहा तुम्ही कुंडीत, जमिनीत किंवा याचे छोटे ओबड-धोबड कंद जमिनीत लावू शकता. त्यांना पुन्हा छोटे छोटे कंद फुटतात, ते एकमेकांना चिकटून वाढतात. त्यातून लांब, थोडी चरचरीत हिरवीगार पानं जमिनीवर येतात. हाच तो 'गवती चहा'. याचं खोड उभं; पण आतून पोकळ असतं! पानांना थोडा लिंबासारखा वास येतो म्हणून याला *'लेमन ग्रास'* असंही म्हणतात, तर कुणी त्याला सुगंधी, गंधत्रिणा, पुतिगंधा असंही म्हणतात. पानांपासून तेल काढतात; त्याचा औषधी उपयोग आहे. शिवाय हे तेल पाण्यात टाकून जमीन पुसल्यास किडे-मकोडे, डास होत नाहीत. संधिवात,



गवती चहा

रान लेऊन निळाई, खोल शिरले स्वप्नात। पाहा फुटली पहाट, ऐन दुपारी उल्हास।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : त्रिभुवनदास पटेल (१९६३) - समाजकार्य

प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली

आमवातावरही गवती चहाच्या पाल्याचा वाफारा उपयुक्त आहे.

गुलाब – तुम्ही गुलाबाच्या पाकळ्या सुट्ट्या करून स्वच्छ धुवा. त्या कापडावर वाळण्यासाठी ठेवा. नंतर या पाकळ्या आणि खडीसाखर एकत्र करून बरणीत भरून ती बरणी उन्हात ठेवा. काही दिवसांत सुगंधी गुलकंद तयार होईल. गोवर, कांजिण्या या उष्णतेच्या विकारांत आणि उन्हाळ्यात रोज एक चमचा तरी गुलकंद खावा, म्हणजे उन्हाळ्याचा त्रास होणार नाही. उष्णतेमुळे ताप आल्यास गुलाबकाडी, मनुका व धने यांचा काढा करून प्यावा. पोटात आग होत असेल, लघवीला जळजळ होत असेल तर गुलाबाच्या पाकळ्या अवश्य खाव्यात.

गुलाब

कोरफड – तुमच्या केसांना चमक येण्यासाठी, डोक्यातला कोंडा घालवण्यासाठी कोरफडीचा गर केसांना अर्धा तास तरी लावून ठेवा, मग केस धुवा. केस स्वच्छ होतील. तुम्हाला कुंडीत, बागेत, जमिनीत, कुंपणाच्या कडेनं कोरफड लावता येईल. कोरफड सहसा मरत नाही. पानं मोठी झाली तरी झाडाला छोटी पिल्लं फुटतात; ती वाढत राहातात.

कोरफड

पूर्ण झाड तोडू नका; पण चुकून तुटलंच तर उलटं टांगून ठेवा. बरेच दिवस झाड जिवंत, हिरवं राहील! कोरफडीला पाणी अगदीच कमी लागतं. आठवड्यातून एक-दोनदा थोडं पाणी घातलं तरी ती चांगली वाढते. कोरफड बहुगुणी आहे. तिचा औषधात खूप वापर करतात. भाजलेल्या त्वचेवर फोड आल्यास लगेच त्यावर कोरफडीचा गर लावला तर आग होतच नाही; शिवाय डाग लवकर नाहीसे होऊन त्वचा नेहमीसारखी होते. याशिवाय सर्दी, पडसे, खोकला, दमा, कफ, श्वास लागणे, पोट फुगणे या सर्व विकारांवर रोज एक चमचा कोरफड रस/गर घेतल्यास कोणतेच विकार होत नाहीत.

पिवळी कोरांटी – सहज उपलब्ध होणारी काटेरी पिवळी कोरांटी देखील बहुउपयोगी आहे. गुडघे, कंबर दुखत असेल, खांदा जखडला गेला असेल, अंगावर सूज आली असेल तर तिच्या मुळांचा काढा करून त्याचा शेक द्यावा किंवा मुळ्या उगाळून दाट व गरम लेप लावला तर सूज आणि ठणका दोन्ही कमी होतो. कोरांटीच्या मुळांचा काढा करायचा असेल तर वेगळ्या पिशव्यांतून त्याची रोपं तयार करा आणि त्यातली मुळं मोठी

निरगुडी

झाली की औषधात वापरा. त्याप्रमाणे **निरगुडीचा** पालादेखील सुजेवर बांधल्यास सूज व ठणका कमी होतो.

गुळवेल – पावसाळ्यात खूप ठिकाणी वाढलेली गुळवेल तुम्ही पाहिली असेलच. गुळवेलीचं खोड चांगलं जाडजूड होतं, तरीही तिला आधार लागतोच. शक्यतो ही वेल मोठ्या झाडाजवळ ऊन येत असेल अशा ठिकाणी लावल्यास चांगली वाढते. गुळवेलीचं सत्त्व पौष्टिक आहे. आमवात झाला असेल तर गुळवेलीच्या बोटाएवढ्या जाड काड्यांचा काढा करून प्यावा. त्याचबरोबर सुंठ चूर्णही तुपाबरोबर खावे किंवा काढ्यातच सूंठ चूर्ण टाकावे. बारीक ताप, आम्ल पित्त, केस पिकणे-गळणे, शरीरावर सूज येत असल्यास गुळवेल खूप उपयुक्त आहे. ही जितकी ताजी तितकी अधिक गुणवान आहे. ती दीर्घायुष्य देणारी आहे.

माका – पावसाळ्यात पाणथळ जागी वाढलेला माका तुम्ही पाहिला असेल. माक्याला पाणी

माका

जणू झाडांच्या भोवती, कुणी कापूस पिंजला। पानावरती पानांच्या, छाया धूसर दाटल्या।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : वेल्थी फिशर (१९६४) - शांती आणि आंतरराष्ट्रीय एकात्मता

प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर ट्रस्ट, पुणे, फोन - ०२०- २४४५०९७५

जास्त लागतं, त्यामुळे माती सतत ओली राहाण्यासाठी रोजच्या रोज झाडाला पाणी घालायला पाहिजे. वीतभर वाढणारा माका अतिशय औषधी आहे. पानांच्या रसाचा उपयोग हाडातल्या मज्जेची झीज भरून काढण्यासाठी होतो. त्यासाठी रोज अर्धा ते एक चमचा पानांचा रस किंवा चूर्ण पोटात घ्यावे. माक्याच्या ताज्या रसात सिद्ध केलेले तेल केसांच्या आरोग्यासाठी चांगले असते.

ब्राह्मी – केसांच्या वाढीसाठी ब्राह्मीही उपयोगी आहे. ब्राह्मीची पानं किडनीच्या आकाराची, हृदयाकृती असतात. ब्राह्मी पसरत

ब्राह्मी

वाढते. ज्या भागात ऊन असेल तिथे ब्राह्मी लावा. संपूर्ण वाफा थोडेच दिवसांत हिरवागार दिसतो. झाडाला पाणी मात्र भरपूर लागतं ! पानांचा रस तेलात घालून लावल्यास केसांना चमक येते, केस वाढतात. स्मरणशक्ती सुधारण्यासाठी ब्राह्मीची रोज पाच–सहा पाने खावीत. अपस्मार, फिट्स येणं किंवा झोप येत नसेल तर ब्राह्मीची पाने किंवा रस घ्यावा.

तुम्हाला मी ‘आजीबाईच्या बटव्यांत’ल्या काही झाडांचे औषधी उपयोग सांगितले. अशीच अजून काही औषधी झाडं तुम्हाला माहीत असतील, तुमच्या आजीला माहीत असतील तर त्याबद्दलची माहिती मिळवा आणि ती आमच्याकडे पाठवा.

अशातऱ्हेने तुम्हीदेखील आजीच्या या बटव्यातील खजिन्यात भर घालू शकता, हो नं!!

•••

– डॉ. कांचनगंगा गंधे
४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे 411030

अद्‌भूत कृमीने दिले नोबेल पारितोषिक !

गांडुळाच्या जातीतली, साध्या डोळ्यांना न दिसणारी, फक्त सूक्ष्मदर्शकाखाली दिसणारी, एक मिलीमीटर लांबीची, ‘पारदर्शक’ कृमी हजारो शास्त्रज्ञांची आवडती! या कृमीवर इंग्लंडच्या सीडने ब्रेनर, जॉन सल्स्टन आणि अमेरिकेच्या हॉरविट्झ या शास्त्रज्ञांनी संशोधन करून २००२ सालचे वैद्यक शास्त्रातले नोबेल पारितोषिक पटकावले!

नळीसारखं शरीर असलेल्या या कृमीचं नाव जरा अवघडच आहे – ‘सीनोरहैब्डैटिस एलेगन्स’. पारदर्शक असल्यामुळे तिच्या शरीरातल्या सर्व ९५९ पेशी आपण सूक्ष्मदर्शकाखाली पाहू शकतो. त्यापैकी ३०० ‘चेतापेशी’ शरीराला चेतना देतात. तर ८१ पेशी या स्नायू पेशी आहेत. कृमीत असलेल्या ‘मेंदू’मुळे जगात ‘कसं वागावं?’, ‘कसं शिकाव?’ हे तिला कळतं म्हणे ! चव, वास, उष्णता, स्पर्श यांचेही ‘ज्ञान’ तिला होत असतं. ही कृमी ‘आंधळी’ असली तरी ‘प्रकाशाचं’ थोडं अस्तित्व तिला समजतं. ८१ स्नायू पेशींच्या आधाराने ती हालचाल करते. तिची हालचाल बघताना छोटे ‘तरंग’ उमटत असल्यासारखं वाटतं. ‘घसा’ आणि ‘आतडं’ या दोन छोट्या नळ्या सोडल्या तर बाकीच्या शरीरात स्त्री आणि पुरुष ‘जननेंद्रिये’ असतात. काही कृमींमध्ये फक्त पुरुष जननेंद्रिये असतात.

कृमीच्या पेशींचं विभाजन होत असतानासुद्धा आपण पाहू शकतो, म्हणून ‘वांशिकता’ ठरविणाऱ्या जनुकांबद्दलची माहिती शास्त्रज्ञांना मिळाली. शरीरातल्या पेशींच्या ‘मरणाची’ ‘नियोजनबद्ध आखणी’ सेड्–३, सेड्–४ ही त्यांच्यातली ‘जनुके’ करतात. शास्त्रज्ञांनी ‘एथील मिथेन सल्फोनेट’ वापरून ही जनुके अकार्यक्षम केली, त्यामुळे पेशींचं ‘मरण’ थांबलं. पेशी ‘मेली’ तर तिला शरीरातून बाहेर टाकण्याचं काम इतर जनुकं कशी करतात हे शास्त्रज्ञांनी शोधलं. कर्करोगांसारख्या असाध्य रोगात या संशोधनाचा नक्कीच उपयोग होईल. ही कृमी ४ कोशस्थ अवस्थेतून जाते, त्यासाठी तिला तीन दिवस लागतात. तिचं आयुष्य दोन ते तीन आठवड्यांचं असतं.

– डॉ. कांचनगंगा गंधे
४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे 411030

ऋतु आल्हाददायक, थोडा गारवा असून। जीर्ण पानांची शेकोटी, नाही पेटली अजून।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : जयप्रकाश नारायण (१९६५) - सार्वजनिक सेवा

प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

चालत राहा

पाखरं गातात
भूप राग
चराचराला
येते जाग.

भिरभिर पाखरं
लागली फिरू
चला उठा
काम करू.

उद्योग करा
मिळेल यश
संपन्न होईल
सारा देश.

प्रतिकूलतेतून
काढत वाट
झाड उभं
असतं ताठ.

थांबेल त्याचं
सारंच थांबतं
झोपेल त्याचं
दैव झोपतं.

चालत राहा
भिऊ नका
फडकत राहील
विजय पताका.

– डॉ. विनय अपसिंगकर
'ओळख', भाग्यनगर, जुना औसा रस्ता, लातूर 413531

गडद दाट धुके पडते, समोर येतो कठिण घाट। पायतळिची सरावातील लोपून जाते पाऊलवाट ।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : कमलादेवी चट्टोपाध्याय (१९६६) - समाजकार्य

प्रायोजक - श्री. अखिलेश संतोष काकडे, पुणे

सागर शिंपले

– नरेन्द्र नायडू

दोस्तांनो, समुद्रकिनारी गेल्यावर किनाऱ्यावर येणाऱ्या लाटांमध्ये तुम्ही मनसोक्त भिजत असाल ना? किनाऱ्यावरच्या वाळूत छोटा किल्ला, बोगदाही तुम्ही केला असेल. माझी नक्की खात्री आहे, की वाळूतले हरतऱ्हेचे शंख, शिंपले, कोरल्सचे छोटे तुकडे यांनी तुम्ही खिसेही भरले असतील. शंख शिंपले गोळा करत असताना; कधी त्यातून एखादा गिळगिळीत, बुळबुळीत गोळा हाताला लागल्यामुळे 'ईऽऽऽऽऽऽई' ओरडून तो शंख, शिंपला तुम्ही टाकलाही असेल. हा गोळा म्हणजे समुद्रात राहणाऱ्या मृदुकाय (Mollusc - मॉलस्क) प्राण्याचं शरीर! आणि ज्याला आपण शंख, शिंपले म्हणतो, ते त्या प्राण्यांनी स्वत:भोवती बांधलेलं घर असतं. शंखाचं घर असतं ते कप्प्यांचं आणि अखंड, तर शिंपल्याच्या घराला कप्पे नसतात; ते घर 'बंद केलेल्या जबड्यासारखं' असतं! कधी कधी 'बंद शिंपला मिळाला, की 'डबी' मिळाली' असं तुम्ही म्हणत असाल ना? तुम्ही ती डबी उघडली की तुम्हाला त्यात 'मृदुकाय' प्राणी नक्की मिळणार! त्याला तोंड, डोळे, हात,पाय आहेत का, हे नक्की बघा. शिंपलेसुद्धा खूप वेगवेगळ्या आकाराचे, प्रकारचे तुम्हाला दिसतील.

शिंपल्यातला प्राणी स्वत:भोवती दोन कवचं (द्विदल कवचं – डबी सारखी) तयार करतो. अशा दोन कवचं तयार करणाऱ्या प्राण्यांचा, मृदुकाय गटाच्या 'बायव्हाल्व्ह' *(Bivalve)* ह्या प्रकारात समावेश होतो. ह्याचे अनेक प्रकार आहेत. शिंपल्याचा आकार, त्यावरची नक्षी, उंचवटे, कातऱ्या, वेटोळ्यांची संख्या, वेटोळ्यांची दिशा, रंगसंगती यांच्या आधारे ह्या शिंपल्याचं वर्गीकरण करतात.

शिंपला कसा तयार होतो? शिंपल्याची मादी एकावेळेला शेकडो अंडी घालते. त्यातून जेव्हा पिले बाहेर येतात तेव्हा ती जन्मदात्यांपेक्षा निराळी दिसतात. ह्या पिलांच्या अंगावर मऊ शालींचे अनेक पदर असतात. ह्यात अनेक ग्रंथी असतात. त्यातून स्राव पाझरतो आणि हळूहळू कवच तयार होते. कवचाची वाढ फक्त कडांना होते त्यामुळे पिलू जरी वाढत असले, मोठे होत असले तरी शिंपल्याचा आकार सर्वसाधारणपणे तेवढाच राहतो. कवच हे मुख्यत्वेकरून 'कॅल्शियम कार्बोनेट'चे म्हणजे खडू सारख्या पदार्थाचे बनलेले असते; पण ते खडू सारखे ठिसूळ नसते. ह्या कवचाला तीन थर असतात. सर्वात बाहेरचा थर 'कॉन्चिन' (Conchin) ह्या प्रथिनाचा बनलेला असतो. त्याचं मुख्य काम म्हणजे आतल्या थरांचं आणि प्राण्यांचं संरक्षण करणं. मधल्या थराला लोलकाचा (Prismatic) थर म्हणतात. तो 'कॅल्शियम कार्बोनेट'च्या स्फटिकाचा बनलेला असतो. हा थर प्रथिनयुक्त द्रवात बुडलेला असतो. सर्वात आतला थर 'कॅल्शियम कार्बोनेट'चा असला तरी त्याला मोत्यासारखी चकाकी आणि झळाळी असते. हा थर प्राण्याच्या शरीरावरच्या मऊ शालीतून सतत तयार होत असतो.

अशा रितीनं मृदुकाय प्राणी स्वत:भोवती स्वत:चं घर तयार करतो. ते 'कॅल्शियम कार्बोनेट'चं असल्यामुळे हळूहळू कडक, कठीण होतं. त्यालाच *'मँटल'* म्हणतात.

झाडातून आरपार, शुभ्र आकाश दिसते। उभ्या राईच्या भोवती, काही धूसर लोटते।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : सत्यजीत रे (१९६७) - पत्रकारिता, साहित्य आणि कला

प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे

शिंपल्यात मोती कसा तयार होतो? शिंपल्याची जेव्हा उघडमीट होत असते, तेव्हा कधी-कधी एखादा वाळूचा बारीक कण किंवा कोणतीही सूक्ष्म वस्तू कवच्याच्या आत गेली तर त्याची बोच आतल्या मऊ प्राण्याला जाणवते. ही टोचणारी बोच किंवा वेदना कमी व्हावी म्हणून तो प्राणी आपल्या मऊ शालीच्या स्त्रावातून वेष्टन तयार करतो. आत शिरलेल्या कणाभोवती हळूहळू समकेंद्री वर्तुळाकार थरांवर थर चढवून वेष्टन तयार केलं जातं. त्याचवेळेला 'अरागोनाईट', 'कॅल्साईट' आणि 'कॉंकियोलिन' ही रसायनं प्राण्याच्या मऊ शालीच्या स्त्रावात तयार होतात. त्या रसायनांचा संयोग होऊन 'नेईकर' हा चकाकी देणारा पदार्थ बनतो. यालाच 'मोत्याची जननी' म्हणतात. स्त्रावाचे थरावर थर चढूनच संपूर्ण गोल, गुळगुळीत, चकाकणारा 'मोती' तयार होतो.

कवच तयार होत असताना मऊ शालीच्या कडांवरील काही पेशी, रंगीत द्रव्य बाहेर टाकतात. सगळीकडून एकाच वेळी जर हे रंगद्रव्य समप्रमाणात बाहेर पडलं तर संपूर्ण कवचाचा रंग एकसारखा दिसतो. मऊ शालीच्या काही भागातल्याच पेशींमधून हे रंगद्रव्य बाहेर पडलं, तर कवचावर रेषा तयार होतात. काही ठरावीक काळानं रंगद्रव्य बाहेर पडत असेल तर ठिपक्यांची माळ तयार होते. त्यातही कधी कमी जास्त प्रमाणात रंगद्रव्य बाहेर टाकलं गेलं, तर नागमोडी, जाड, बारीक रेषा उमटतात. प्राण्यांच्या आहारावरही शिंपल्यांचे रंग अवलंबून असतात; पण तरीही एकाच जातीच्या शिंपल्यांमध्ये एकाच प्रकारची नक्षी उठते हे विशेष.

शिंपल्याचं द्विदल कवच एकमेकांना लवचिक धाग्यांनी जोडलेले असतं; त्यांना *'लिगामेंट'* म्हणतात. ह्या धाग्याच्या साहाय्यानं शिंपल्याची उघडझाप होते. ह्या धाग्यांचे दोन प्रकार आहेत. काही धागे लवचिक पण कमकुवत असतात. त्यामुळे शिंपला मिटू शकतो. काही धागे लवचिक आणि बळकट असतात त्यामुळे शिंपला घट्ट बंद होतो. असा आतून घट्ट बंद झालेला शिंपला उघडणं कठीणच असतं!

पाण्याच्या प्रवाहातले अनेक सूक्ष्म प्राणी, वनस्पती हे शिंपल्यांचं अन्न!! श्वासोच्छ्वासाबरोबर हे अन्न गाळून आत घेतलं जातं! न पचलेलं अन्न बाहेरही फेकलं जातं! शिंपले जसे समुद्रात सापडतात तसे ते नद्यांमध्ये,



तळ्यांमध्ये किंवा डबक्यातही मिळतात. ते जरी वेगवेगळ्या प्रकारात आणि कुळात मोडत असले तरी ढोबळ मानाने मुख्यत्वेकरून त्यांचे तीन प्रकार आहेत.

प्रत्येक प्रकारात कवचाचा रंग वेगवेगळा असतो. 'शालव' (Scallop) ह्या प्रकारात कवचाचा आकार 'प्लेट' सारखा असतो. शालव जेव्हा पोहतात, तेव्हा कवचाची वेगानं उघडझाप करत लयबद्ध हेलकावे खात पोहतात; पण अनेकवेळा ते समुद्राच्या तळाशी पडून असतात. 'शुक्ती' (Clams) आणि 'शिंपला' किंवा 'कालव' (Mussel) ह्यांची कवचं आपण नेहमी बघतो त्या प्रकारच्या शिंपल्यासारखी दिसतात. दोन्ही कवचं सारखी असतीलच असं नाही. काहीत एक भाग दुसऱ्यापेक्षा मोठा असतो, तर काहींमध्ये दोन्ही कवचं सारखी असतात. शुक्ती आणि शिंपला हे सर्वसाधारणपणे सारखेच दिसतात. हे दोन्ही खाऱ्या आणि साध्या पाण्यात सापडतात. शुक्तीचं कवच चकाकणारं पण कडक असतं तर कालवाचं कवच त्यामानाने खरखरीत असतं. शुक्ती शिंपले स्वत:ला गाळात पुरून घेऊन राहातात. कालव खडकाला किंवा कुठल्याही आधाराला बारीक धाग्यांनी चिकटलेले असतात. ह्या दोन्ही प्रकारातले काही शिंपले (म्हणजे आतले प्राणी-कालवं) खाण्यासाठीही वापरतात.

यापुढे जेव्हा तुम्ही समुद्रकिनाऱ्यावर जाल, तेव्हा अधिक डोळसपणे शिंपल्याचं निरीक्षण आणि वर्गीकरण करण्याचा नक्की प्रयत्न करा.

•••

- नरेन्द्र नायडू
प्रमुख, प्राणिशास्त्र विभाग, मॉडर्न महाविद्यालय, पुणे 411 005

(शिंपल्यांची रंगीत प्रकाशचित्रं मलपृष्ठावर पाहा.)

झाडापानांत थंडीचा इथे खेळ पोचला। ग्रीष्माच्या आगमनाची खूण मिळाली मनाला।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : मोनकोम्पु संबाशिवन स्वामीनाथन (१९७१) - गट नेतृत्व
प्रायोजक - श्री. राहुल भिडे, पुणे

संघर्ष आणि जिद्दीला सलाम!!

– सुरेंद्र पाटसकर

यावर्षी ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ओंकार ओतारी, गणेश माळी व चंद्रकांत माळी या तिघांनी महाराष्ट्राची व पर्यायाने देशाची पताका फडकविली. एकच स्पर्धा, एकच क्रीडा प्रकार, एकच प्रशिक्षक, एकच गाव आणि एक सारखेच पदक असा अनोखा धागा या तिघांच्या बाबतीत जुळला आहे. पदकापर्यंत घेऊन जाणाऱ्या त्यांच्या संघर्षमय तरीही जिद्दीने केलेल्या वाटचालीला सलाम!

'संधी पुन्हा पुन्हा येत नाही. मिळालेल्या संधीचे सोने करा. सर्वस्व पणाला लावा. रिकाम्या हाताने परतू नका...,' कुरुंदवाडमधील हर्क्युलस जिममधील प्रशिक्षक प्रदीप पाटील ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेसाठी निवड झालेल्या आपल्या चेल्यांना म्हणजे ओंकार ओतारी, गणेश माळी आणि चंद्रकांत माळी यांना सांगत होते. या तिघांनीही त्यांचे शब्द खरे केले व गावाचे व *जिमचे* नाव त्रिखंडात पोहोचविले.

कोल्हापूरपासून ५० ते ६० किलोमीटर अंतरावर कृष्णा-पंचगंगेच्या संगमावर कुरुंदवाड हे गाव आहे. पटवर्धन सरकारांमुळे या गावाला प्रतिष्ठा मिळाली आहे. या गावात क्रीडा संस्कृती रुजायला सुरवात झाली ती खो-खोमुळे. व्हॉलीबॉलमध्येही कुरुंदवाडचे नाव देशाच्या नकाशावर चमकले. आता *वेटलिफ्टिंगमुळे* गावाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहे.

गणेशची जिद्द

आपला मुलगा कुठेतरी परदेशात गेलाय आणि तिकडे रात्रीचा दिवस असतो. आपल्या मुलाला टीव्हीवर पाहता येईल म्हणून गणेश माळीचे वडील चंद्रकांत माळी मध्यरात्र उलटून गेल्यानंतरही टीव्ही पाहत असतात. गणेशने *वेटलिफ्टिंगमध्ये* ब्राँझ पदक मिळविल्याचे त्यांनी टीव्हीवर बघितले आणि त्यांच्या आनंदाला पारावर उरला नाही. त्यांचे छोटेसे घर रात्रीच्या अंधारातही उजळून निघाले.

गणेशच्या आई-वडिलांचे शिक्षण दोन-तीन इयत्तांपर्यंत झाले आहे. वडील पेंटरकाम करतात तर आई शेतमजुरीला जाते. 'आपला मुलगा वजनं उचलतो', याची त्यांना गंमत वाटते. गणेशचा चुलतभाऊ रवींद्र माळी हा *वेटलिफ्टिंगमधील* राष्ट्रीय खेळाडू आहे. त्याच्यामुळेच गणेश *वेटलिफ्टिंगकडे* वळला. रवींद्रपेक्षा गणेश सहा

गणेश माळी

वर्षांनी लहान. गणेशमधील गुण रवींद्रने हेरले. त्याने गणेशला प्रशिक्षक प्रदीप पाटील यांच्याकडे नेले. रवींद्रलादेखील *वेटलिफ्टिंगमध्ये* अजून प्रगती साधायची होती. पण त्याची इच्छा अपुरी राहिली. आपली अपुरी इच्छा त्याने गणेशच्या रूपाने पूर्ण केली.

बाराव्या वर्षापासून गणेश हा प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली *वेटलिफ्टिंगचे* धडे गिरवू लागला. प्रचंड कष्टाचा हा क्रीडा प्रकार असल्याने त्याचा 'खुराक'ही मोठा होता. या 'खुराकाची कशी सोय करायची' असा प्रश्न गणेशच्या आई-वडिलांपुढे होता. परंतु त्यांनी पोटाला चिमटा घेऊन मुलांसाठी कष्ट उपसले. प्रशिक्षक प्रदीप पाटील यांनी काही प्रमाणात आर्थिक भार उचलला. त्यामुळे त्यांची काळजी मिटली. गणेशनेही सर्वांच्या कष्टाची जाणीव ठेवत यशाला गवसणी घातली. ग्लासगो येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत त्याने ५६ किलो गटात ब्राँझ पदकाची कमाई केली. त्याने *स्नॅचमध्ये* १११ किलो तर *जर्कमध्ये* १३३ किलो, असे एकूण २४४ किलो वजन उचलले. त्याच्याच गटात भारताच्या सुकेन डे याने २४८

झाडापानांत थंडीचा, इथे दरवळ पोचला। ग्रीष्माच्या आगमनाची, खूण मिळाली मनाला।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : महेंद्रसिंग सुब्बलक्ष्मी (१९७४) - सार्वजनिक सेवा/ समाजकार्य

प्रायोजक - प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे

किलोसह सुवर्ण व मलेशियाच्या पिसोलने २४५ किलोसह रौप्यपदक मिळविले. शेवटच्या प्रयत्नात १३६ किलो वजन उचलता न आल्याने गणेशला ब्राँझपदकावर समाधान मानावे लागले. गणेशची ही पहिलीच आंतरराष्ट्रीय स्पर्धा होती. राज्य निवड चाचणीत त्याने २४८ किलो वजन उचलले होते. तीच कामगिरी त्याने इथे करून दाखवली असती, तर त्याला सुवर्णपदकालाही गवसणी घालता आली असती.

गणेशचे शिक्षण इ. १२ वीपर्यंत झाले आहे. त्यानंतर त्याला क्रीडा कोट्यातून हवाईदलात शिपाई म्हणून नोकरी मिळाली. त्याने *वेटलिफ्टिंगचा* छंद चिकाटीनं जोपासला. प्रचंड मेहनत घेतली आणि यशाला गवसणी घातली.

ओंकारची गुडघेदुखीवर मात

ओंकार ओतारी हा मूळचा चिपळूणचा. तिसरीत असताना तो आजोळी कुरुंदवाड येथे आला. त्याचे वडील शेखर ओतारी हे खासगी कंपनीत बस ड्रायव्हर होते. ओंकार दहावीत असताना इ.स.२००३ मध्ये त्यांचे आकस्मिक निधन झाले. राष्ट्रीय स्तरावरील *वेटलिफ्टर* मामेभाऊ प्रशांत ओतारी यांच्या प्रेरणेने तो *जिममध्ये* जाऊ लागला. मामा ज्ञानेश्वर व विश्वासू ओतारी यांनी त्याचा सांभाळ केला. साड्यांना फॉल-पिको करून आईने उदरनिर्वाह केला. त्याच्या आईचे इ.स.२०१२ मध्ये कर्करोगामुळे निधन झाले. त्याचा खूप मोठा धक्का ओंकारला बसला. कित्येक दिवस तो प्रचंड मानसिक तणावाखाली होता. प्रशिक्षक प्रदीप पाटील, विजय माळी, विश्वनाथ माळी, पत्नी नम्रता, सासरे नंदकुमार दळवी यांनी ओंकारमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

ओंकारने इ. स. २००४पासून *वेटलिफ्टिंगमध्ये* आपली चमक दाखविली आहे. त्याच्या कौशल्यामुळे त्याला पश्चिम रेल्वेत नोकरीही मिळाली. तो दोन वर्षे रेल्वेचा चँपियन होता. चार आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्याने भाग घेतला. त्यापैकी ढाका येथे झालेल्या सॅफ स्पर्धेत त्याने सुवर्णपदकही मिळविले.

राष्ट्रकुल स्पर्धेच्यावेळी त्याचा गुडघा दुखावला होता. प्रत्यक्ष स्पर्धेच्याआधी एक दिवस प्रशिक्षकांनी त्याच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि 'मिळालेल्या संधीचे सोने कर' या संदेशाची आठवण करून दिली. ओंकारनेही गुडघेदुखीवर मात करत प्रशिक्षकांचा शब्द खरा केला. ६९ किलो वजनी गटात त्याने भारताला ब्राँझपदक मिळवून दिले.

चंद्रकांतच्या आत्मविश्वासाला यश

गणेश आणि ओंकार यांच्याप्रमाणेच चंद्रकांत माळी हाही हर्क्युलस *जिमचाच* खेळाडू. कुरुंदवाडमध्ये त्याचा जन्म झाला. त्याचे तब्बल ३० जणांचे एकत्र कुटुंब आहे. त्याच्या क्रीडाप्रेमाला घरातून तसा कधीच विरोध झाला नाही. *वेटलिफ्टिंगच्या* प्रेमापोटी तो हर्क्युलस *जिममध्ये* सराव करू लागला. राष्ट्रकुल स्पर्धेपूर्वी त्याने काही मोठ्या स्पर्धांत भाग घेतला होता. गेल्या स्पर्धेत त्याचे पदक थोडक्यात हुकले होते. त्यामुळे काही काळ त्याचा आत्मविश्वास कमी झाला होता. त्याला निराशेने घेरले

ओंकार ओतारी

चंद्रकांत माळी

धुक्याची पांघरून शाल, आला हिवाळा हिवाळा। गप्पांचा फड रंगला, पेटल्या शेकोटीच्या ज्वाळा।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : बुबली जॉर्ज व्हर्गिस (१९७५) - क्रिएटिव्ह कम्युनिकेशन, कला

प्रायोजक - कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे

होते. त्याच्या आधीच्या कामगिरीच्या जोरावर त्याला भारतीय लष्करात नोकरी मिळाली. सध्या तो हवालदार असून, त्याची नेमणूक पुण्यात आहे. यावर्षीच्या स्पर्धेत पदक मिळविण्याची जिद्द त्याने मनात ठेवली होती. पुरुषांच्या ९४ किलो वजनी गटात *स्नॅचमध्ये* १५० किलो आणि *क्लीन अँड जर्कमध्ये* १८८ किलो वजन उचलण्याची त्याने कामगिरी केली. एकूण ३३८ किलो वजन त्याने उचलले. ह्या कामगिरीसाठी त्याला ब्राँझ पदक मिळाले.

हर्क्युलस जिमच्या या तिघा खेळाडूंनी राष्ट्रकुल स्पर्धेत ब्राँझ पदक मिळविल्याने देशभरातील युवकांनी *जिमशी* संपर्क साधण्यास सुरुवात केली. हे सर्व २० - २२ या वयोगटातील खेळाडू होते. परंतु, प्रशिक्षक प्रदीप पाटील यांनी या सर्वांना नम्रपणे नकार दिला. आंतरराष्ट्रीय स्पर्धांत खेळाडूंनी चमक दाखवावी यासाठी प्रदीप पाटील १० ते १२ वर्षांच्या मुलांनाच *जिममध्ये* प्रवेश देतात. सध्या या *जिममध्ये* ३५ ते ४० खेळाडू प्रशिक्षक प्रदीप पाटील यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहेत. लहान वयापासून मोठ्या स्पर्धेचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यांना घडविले जाते. या प्रशिक्षकाच्या व त्यांच्याकडे प्रशिक्षण घेणाऱ्या खेळाडूंच्या जिद्दीला सलाम!!

●●●

– सुरेंद्र पाटसकर
१३४८, सदाशिव पेंठ, पुणे 411030

सुशोभन मिठाई बॉक्सचे !!

साहित्य – मिठाई खोके, कोणत्याही आकाराचे कापड किंवा फिकट रंगीत घोटीव कागद, फेव्हीकॉल/फेव्हीबाँड, कात्री, काचेच्या रंगीत बांगड्या, लेस, ३डी *आउट लायनर* किंवा रंगीत रांगोळी, प्लास्टिक कागद इ.

कृती – प्रथम मिठाईचे खोके स्वच्छ करून घ्या. आतून बाहेरून रंगीत कागद/कापड फेव्हीकॉल लावून घ्या. आता बांगडी घेऊन बांगडीचे वक्राकार तुकडे करा. बांगडीचे तुकडे मेणबत्तीच्या ज्योतीच्या मध्यावर धरावे बांगडीची काच थोडीशी गरम झाली की त्याचा पाकळीसारखा आकार तयार होईल. असे छोट्या मोठ्या पाकळीचे आकार करून घ्या. खोक्याच्या झाकणाच्या वरील चौकोनी भागावर आपल्याला हव्या तशा आकारात डिझाईन करून त्याप्रमाणे तयार केलेल्या बांगड्यांच्या पाकळ्या व तुकडे लावा. पूर्ण वाळल्यावर *३डी आउटलायनरने* बांगडीच्या चिकटवलेल्या पाकळ्यांवर अथवा तुकड्यांवर ठिपके द्या. डिझाईन व्यतिरिक्त जी रिकामी जागा दिसेल तेथे फेव्हिकॉल लावून त्यावर रंगीत रांगोळी टाकली की बॉक्सवर छानसे डिझाईन तयार होईल. डिझाईनच्या कडेने रंगीत लेस लावून घ्या. सजावट पूर्ण झाल्यावर त्यावर प्लास्टिक पेपर लावून घ्या. म्हणजे सुशोभन दीर्घकाळ टिकेल. अशा रितीने तुम्ही कोणत्याही आकराच्या मिठाई बॉक्सचे सुशोभन करू शकता. अशा सुशोभित केलेल्या मिठाई बॉक्समधून तुम्ही घरी तयार केलेली मिठाई मित्र-मैत्रिणींच्या वाढदिवसाला द्यायला तुम्हाला आवडेल नं? मग लागा कामाला. वेगवेगळी डिझाईन्स वापरून कल्पकतेने बॉक्सचे सुशोभन करा व त्याचे फोटो आमच्याकडे पाठवा.

– शोभना साठे
११४३, 'दीपक', शुक्रवार पेठ, पुणे 411002

शिशिरातील पानगळ अन् भरारणारा पिसाटवारा। संध्याकाळी आकाशात राज्य करतो शुक्रतारा।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : हेनिंग होल्क - लार्सन (१९७६) - शांती आणि आंतरराष्ट्रीय एकात्मता

प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे

विज्ञान प्रयोग

तयार करा उसळणारा चेंडू अर्थात बाऊंसिंग बॉल

साहित्य : बोरॅक्स (औषधांच्या किंवा वाण्याच्या दुकानात मिळते.), गरम पाणी, मका स्टार्च पावडर, ग्लू, दोन प्लॅस्टिक कप किंवा भांडी, प्लॅस्टिकचा चमचा, खायचा कोणताही रंग.

कृती : एका कपात साधारण १२० मिली. गरम पाणी ओता. त्यात एक चमचा बोरॅक्स पावडर घाला आणि ढवळा. बोरॅक्स पाण्यात विरघळेल. दुसऱ्या कपात एक चमचा 'ग्लू' ओता. त्यात खायच्या रंगाचे तीन-चार थेंब टाका. त्याच कपात अर्धा चमचा बोरॅक्सयुक्त पाणी (पहिल्या कपातलं) टाका. नंतर १ चमचा मका स्टार्च पावडर टाका. मिश्रण ढवळू नका. ते तसेच स्थिर ठेवा. त्या सगळ्यांमध्ये रासायनिक प्रक्रिया घडेल. त्यासाठी २५ ते ३० सेकंद थांबा. नंतर ते मिश्रण ढवळून पूर्ण एकजीव करा. जेव्हा मिश्रण ढवळणे अशक्य होईल तेव्हा कपातून ते बाहेर काढून त्याला चेंडूचा आकार द्यायला सुरुवात करा. पहिल्यांदा ते मिश्रण खूप चिकट वाटेल; पण तुम्ही हातानी तसंच मळत राहा, त्याचा घट्ट गोळा व्हायला लागेल आणि हळूहळू त्याचा चेंडू तयार होईल.

काय होतं? : बोरॅक्स आणि 'ग्लू'मध्ये रासायनिक क्रिया घडते. 'ग्लू'मध्ये पॉलिमरच्या कणांची साखळी (चेन) असते. तुम्ही जेव्हा 'ग्लू'उचलता तेव्हा हे कण एकमेकांना चिकटलेलेच राहतात. मका स्टार्च पावडरमुळे पॉलिमरचे कण एकत्र धरून ठेवले जातात.

अजून काय कराल? : जास्तीत जास्त उसळी मारणारा चेंडू तयार करण्यासाठी 'ग्लू', बोरॅक्स आणि मका स्टार्च पावडरचं कोणतं प्रमाण घ्यावं? त्याचे प्रयोग करा आणि उसळी मारणारा चेंडू बनवा.

केस विंचरा आणि पाण्याला वाकवा

नळातून जी पाण्याची धार पडते, ती नेहमी सरळच असते. पण तुम्ही तिला अगदी सहज वाकवू शकता; पण त्यासाठी आठ-दहा वेळा कंगव्याने केस विंचरा, की वाकलीच पाण्याची धार ! कसं शक्य आहे? पाहूया...

कसं घडतं? : तुम्ही कमीत कमी आठ-दहा वेळेला भराभर केस विंचरा आणि लगेच कंगवा पाण्याच्या धारेजवळ धरा. कंगव्याचा स्पर्श पाण्याला करू नका. कंगव्याने केस विंचरल्यामुळे कंगव्यावर स्थिर विद्युत शक्ती निर्माण होईल. केसावरचे 'ऋण' विद्युत भार असलेले 'इलेक्ट्रॉन्स' कंगव्यावर येतील. त्यामुळे कंगव्यावरच्या 'ऋण' विद्युतभार असलेल्या 'इलेक्ट्रॉन्स'ची संख्या जास्त होईल. पाण्याच्या धारेमध्ये 'धन' आणि 'ऋण' विद्युतभार असलेल्या 'इलेक्ट्रॉन्स'ची संख्या समान असल्यामुळे तिथला विद्युतभार 'न्यूट्रल' असतो. 'धन' आणि 'ऋण' विद्युतभार एकमेकांकडे आकर्षिले जातात. जेव्हा तुम्ही 'ऋण' विद्युतभारयुक्त कंगवा पाण्याच्या धारेजवळ धरता तेव्हा पाण्यातले 'धन' विद्युतभार असलेले इलेक्ट्रॉन्स कंगव्यावरच्या 'ऋण' विद्युतभार असलेल्या 'इलेक्ट्रॉन्स'कडे ओढले जातील, त्यामुळे पाण्याची धार वाकलेली दिसेल.

अजून काय कराल? : कंगवा, नायलॉन किंवा पॉलिएस्टर कपड्यांवर घासला आणि पाण्याच्या धारेजवळ धरला तर...

(संकलन-इंटरनेट)

एखादी वाट घेऊन जाते, झाडीवरल्या डोंगरावर। थंडगार वाऱ्याच्या झुळका, लपेटून घ्याव्या अंगावर॥

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : इला रमेश भट्ट (१९७७) - गट नेतृत्व

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरेक्टर, अ‍ॅसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. २५३८०४०६), पुणे



वेडं वय

– शिल्पा कुलकर्णी

छात्र प्रबोधनच्या सौर आश्विन शके १९२९ / ऑक्टोबर २००७ च्या अंकातील 'वेडं वय' लेखिका शिल्पा कुलकर्णी यांच्या कथेचं नाट्यरूपांतर केलं आहे. त्याचप्रमाणे अन्य कथांचं नाट्यरूपांतर करण्याचा तुम्ही अवश्य प्रयत्न करा अन् त्या एकांकिका स्नेह संमेलनात सादर करा.

प्रवेश १ : मानसीचं घर

दृश्य : (मानसी आरशात बघून स्वत:ला निरखते आहे. सकाळची अकराची वेळ. गडबडीत मानसीची आई तिथे येते.)

आई : मानसी, अगं ए मानसी, झालं की नाही आवरून... सकाळचे अकरा वाजून गेलेत. शाळेत जायची वेळ झाली आहे. घड्याळाकडे लक्ष आहे का तुझं?

मानसी : (वैतागून) हो गं आई... काय गं तुझी रोजची कटकट?

आई : बोलू नको तर काय करू? शाळेत जायला उशीर होतोय, तरी आरशात बघणं चालूच आहे अजून... एवढं तास-तासभर आरशासमोर उभं राहून काय बघत असतेस, कुणास ठाऊक?

मानसी : अगं, सगळं आवरून झालंय माझं. शाळेचं दप्तर भरलंय. डबा घेतलाय. प्रयोगाची वही, चित्रकलेचं *बुक* सगळं-सगळ्ळं घेतलंय. आता फक्त बूटच घालायचे राहिलेत. (बूट घालता घालता) झालं तुझं समाधान. चल, जाऊदे मला...

आई : आणि हे गं काय? केसाचं असंच टोपलं ठेवणार आहेस की काय? चांगलं तेल लावून चापून चोपून दोन वेण्या घालायच्या सोडून, हेऽऽ असे सगळे केस डोळ्यांवर का घ्यायचेत? चकणी बघायला लागशील एक दिवस अशामुळे.

मानसी : ए आई, मला कळतंय बरं का ! मी त्या काकूबाई *स्टाईल* दोन वेण्या मुळीच घालणार नाही. असे मोकळे सोडलेले केस किती छान

आली थंडीची लाट, सारे काही धुके झाले। रोज गजबजलेले रान, आता मुके झाले ।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : मबेले अरोले (१९७९) - गट नेतृत्व

प्रायोजक - सौ. रंजना सतीश कुलकर्णी, सातारा

दिसतात मला. आणि बोलत बसण्यामुळे आता नाही वाटतं उशीर होणार?

आई : अॅहॅ म्हणे छान दिसतात !! शाळेतून बाईंची केसांवरून तक्रार आली तर खुशाल 'हवी ती शिक्षा करा मानसीला' असं मी सांगून टाकणार आहे.. कळलं. आणि हो.. सायकल जोरात चालवून ताप देऊ नका माझ्या डोक्याला! दुबईवरून *प्रोजेक्ट* सोडून बाबा काही येऊ शकणार नाहीत निस्तरायला..

मानसी : (दरवाजा उघडत) मी आत्ता जातेच कशी... नाहीतर परत दुबई पुराण सुरू करशील.

आई : हळू चालव गं सायकल, परत बजावतेय. अच्छा. *बाऽय...*

प्रवेश २ : शाळा

दृश्य : (शाळेचं पटांगण. मुलींचे घोळके उभे आहेत. मानसी सायकल लावून शाळेत येते.)

शमिका : काय गं मानसी.. आज एकदम खुशीत ना? शुक्रवार आहे म्हटलं.. नामजोशी सरांचा चित्रकलेचा तास म्हटल्यावर उत्साह संचारला ना एकदम!

मानसी : पुरे हं शमिका. एवढं काही चिडवायला नको. आवडतेच मला चित्रकला. आणि नामजोशी सर काय म्हणतेस?

सोनिया : बरं मग, 'निखिल सर' म्हणायचं का त्यांना? (सगळे हसतात.)

मानसी : (इकडे-तिकडे बघत) मैत्रेयी आली नाही का अजून? दिसत नाहीये कुठे?

शमिका : (खिजवत) मैत्रेयी तुझी 'खास मैत्रीण' वर्गात जाऊन बसली देखील.

मानसी : ए, मलाच नाही तर माझ्या आईलाही आवडते ती. कळलं !! माझी आई तर तिचं कौतुक करताना थकतच नाही. शांत, मितभाषी, समंजस, अभ्यासू काय-काय विशेषणं असतात तिच्या नावापुढे.

सोनिया : चला, तास सुरू होण्याची घंटा होईल आता. शाळा सुटल्यावर आपण गप्पा मारत बसूया.

केतकी : ते बघ मानसी, निखिल सर चाललेत वर्गात. चला पटापट.

मानसी : अय्या, निखिल सरांनी 'आकाशी' म्हणजे माझ्याच आवडीच्या रंगाचा शर्ट घातलाय की! आमची आवड अगदी एक आहे. (सर्वजणी वर्गात येऊन बसतात, निखिल सर वर्गावर येतात)

सर : आपल्या शाळेतल्या मुलींनी काढलेल्या चित्रांचं प्रदर्शन भरवणार आहोत. हे सगळ्यांना माहीत आहे. तशी *नोटीससुद्धा* आपण *बोर्डवर* लावली होती. त्याप्रमाणे माझ्याकडे काही जणींची चित्रे जमा झालेली आहेत. त्यातील काही प्रदर्शनासाठी योग्य अशा चित्रांची मी आज निवड करणार आहे. प्रत्येक इयत्तेच्या, प्रत्येक तुकडीतून एक किंवा दोन चित्रं ठेवण्यात येतील.

मैत्रेयी : (उभं राहून) सर, आमच्या नववी 'ब' च्या वर्गातून तुम्ही कुणाची चित्रं निवडलीत, हे आम्हाला कधी कळणार?

सर : तेच तर सांगतोय... मैत्रेयी खाली बस बाळ..

मानसी : (कानात कुजबूजत) ईऽऽ, सर 'बाळ' काय म्हणतात मैत्रेयी तुला? बघ, प्रदर्शनासाठी माझंच चित्र निवडतील ते... मला खात्री आहे.

सर : मानसी गप्पा पुरे. नाव ऐकायचंय नं...

मानसी : (ओशाळून) *सॉरी* सर

सर : या म्हणजे 'नववी ब' च्या वर्गातून 'सायली देसाई'चं चित्र प्रदर्शनासाठी निवडलं आहे. त्याहीपुढे जाऊन आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत आपण आपल्या शाळेच्या वतीनं वरिष्ठ गटासाठी तिचं चित्र पाठवतो आहोत. तेव्हा आपण तिचं टाळ्या वाजवून अभिनंदन करूया...

दृश्य : (वर्गात सर्व मुली टाळ्या वाजवतात)

मैत्रेयी : मानसी, टाळ्या वाजवून सायलीचं अभिनंदन करणार ना?

हिव पडलं पडलं, पीक डोललं डोललं। पीक डोललं डोललं, भाग्य राजाचं खुललं।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : रजनीकांत अरोले (१९७९) - गट नेतृत्व

प्रायोजक - डॉ. विनायक देसूरकर, पुणे

मानसी : (अपमानित होऊन) मुळीच नाही. *चिटिंग* आहे ही ! माझ्या चित्रकलेचं कौतुक करायचं अन् सरांनी चित्र मात्र सायलीचं निवडायचं.

मैत्रेयी : अगं, सायलीचं चित्र खरंच खूप सुंदर आहे. तिच्या चित्रातली हरणाची जोडी अगदी खरीखुरी वाटतेय.. बघ जरा.

मानसी : (वेडावून) तसं काही नाहीये बरं का.. माझंही निसर्गचित्र चांगलं होतं. आणि माझ्या चित्राचं कौतुकही केलं होतं सरांनी. मला 'रंगसंगतीची चांगली जाण आहे,' म्हणत होते सर. चित्र काढताना देखील सर माझ्याचकडे बघत होते; हे मला काय कळत नव्हतं का?

मैत्रेयी : (चमकून पाहत)काहीतरीच बोलू नकोस मानसी. चित्र काढणाऱ्या सर्वांनाच ते प्रोत्साहन देतात.

सर : शांतता... कुणीही आपापसात बोलू नका. मैत्रेयी, मानसी शांत बसा. सायली तुझं चित्र आत्ता माझ्याकडून घेऊन जा. त्याला फ्रेम करून आण; म्हणजे स्पर्धेसाठीही आपल्याला ते पाठवता येईल. खराब होणार नाही. चला, आज आपण इथेच थांबूया.

सायली : (उभं राहून) सर, मला बोलायचंय दोन शब्द.

सर : अशी वर्गापुढे ये आणि बोल.

सायली : सर, माझं चित्र निवडल्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. मला चित्रकला विषय मनापासून आवडतो. मला तुमचं मार्गदर्शन मिळालं तर मी खूप मेहनत घेईन आणि वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभागी होईन. पुढे जाऊन मी चित्रकलेतच *करिअर* करायचं ठरवलं आहे.

सर : जरूर. प्रत्येकाला प्रोत्साहन देण्यासाठीच तर मी आहे. तू केव्हाही ये. तुला चित्रकलेविषयीचं मार्गदर्शन नक्की मिळेल. (सर्व विद्यार्थिनी टाळ्या वाजवतात. सर वर्गातून बाहेर पडतात)

मानसी : (स्वत:शी, खुनशीपणाने) स्पर्धा काय.. मार्गदर्शन हवंय काय.. थांब तुझी आता चांगली जिरवतेच, सायली.

प्रवेश ३ : वर्ग

दृश्य : (वर्गात सायली रडते आहे. तिच्याभोवती मुलींचे कोंडाळे आहे.)

नीरजा : काय झालं सायली? अशी रडतेस काय? आज तर तुझं किती कौतुक झालं वर्गात..

मैत्रेयी : (मानसीकडे बघत) हो नं... कुणी काही बोललं का तुला?

सायली : (रडत) स्पर्धेसाठी पाठवायचं माझं चित्र मी सरांकडून घेतलं. ते फ्रेम करण्यासाठी नीट दप्तरात ठेवलं. मधल्या सुट्टीत ते चित्र दप्तरातच होतं. मी डबा खाऊन झाल्यावर बघते तर चित्र गायब. सगळीकडे शोधलं, कुठंच दिसत नाही. आता मी काय करू? सरांना काय सांगू?

केतकी : अगं, सरांना काय घडलं ते सांगून टाक; म्हणजे तेच काहीतरी मार्ग काढतील.

मैत्रेयी : खरंच, सायली तू नीरजाबरोबर जा अध्यापक कक्षात. तोपर्यंत आम्ही काहीजणी तुझं चित्र शोधतो. आधी रडणं थांबव म्हणजे तुला काहीतरी सुचेल. तोंडावर पाणी मार. शांत हो आणि मग जा सरांकडे.

दृश्य : (अध्यापक कक्ष : सायली, नीरजा येतात. त्यांच्या पाठोपाठ मानसी लपून बघते.)

नीरजा : सर आत येऊ?

सर : अरे, तुम्ही दोघी आत्ता इथे? तास सुरू झाला असेल नं पुढचा?

नीरजा : हो सर; पण सायलीला काहीतरी सांगायचंय.

सर : काय झालं सायली? तू रडवेली का दिसतेस?

सायली : सर, सकाळी तुम्ही दिलेलं माझं चित्र दिसत नाहीये दप्तरात. कुठेतरी गायब झालंय... किंवा कदाचित... कुणीतरी खोडी काढलीये माझी. नाहीतर ते चित्र असं जाईल तरी कुठं? आता काय करायचं? स्पर्धेचं काय होईल?

कोमल त्या गवतावर, होता न कि अरुणोदय। ओघळले नीलांतून, दवबिंदू तेजोमय।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : गौर किशोर घोष (१९८१) - पत्रकारिता, साहित्य आणि कला

प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली

सर : (विचारात) सायली स्पर्धेत चित्र पाठवायला अजून तीन दिवसांचा अवधी आहे. एकीकडे आपण तुझं चित्र शोधूच! पण या २-३ दिवसांत नव्याने तू चित्र काढून दिलंस तर ते आपण स्पर्धेला पाठवू शकू. हं... आता घाई होईल थोडी; पण दुसरा पर्यायही दिसत नाही.

सायली : घाई झाली तरी चालेल. मी नव्याने चित्र काढेन सर. स्पर्धेत माझं चित्र पाठवण्यासाठी मी कितीही मेहनत घ्यायला तयार आहे.

सर : (पाठीवर शाबासकी देत) शाब्बास ! *यह हुई नं बात !!* याला म्हणतात *स्पोर्टिंग स्पिरीट...* चला लागा कामाला.

सायली : (हसत) जशी आज्ञा सर!

मानसी : (स्वत:शी) *स्पोर्टिंग स्पिरीट* म्हणे... सर नुसता कौतुकाचा वर्षाव करतायत तिच्यावर...

प्रवेश ४ : मानसीचं घर

दृश्य : (मानसी साध्या वेशात, आईच्या हातात खायच्या पदार्थांची थाळी)

मानसी : (लाडाने) आई, मला चित्रकलेच्या क्लासला जायचं आहे.

आई : अगं जीवशास्त्राच्या आकृत्याही धड काढत नाहीस; एवढी कधीपासून तुला चित्रकला आवडायला लागली? ठीक आहे, पलीकडच्या गल्लीतल्या देशपांडे काकांकडे जा. ते घेतात चित्रकलेचे क्लास.

मानसी : मी नाही देशपांडे काकांकडे जाणार. आमच्या शाळेतले सर आहेत, ते कोथरूडला राहतात. ते करतात ‘मार्गदर्शन’. मी त्यांच्याकडे जाईन.

आई : (हसत)‘मार्गदर्शन’, हे काय ऐकतेय काय मी? काय ‘मोठ्ठाले’ शब्द वापरतेस.. आणि कुठे जाणार? कोथरूडला? मी नाही एवढ्या लांब पाठवणार तुला सायकलवर... सांगून ठेवतेय.

मानसी : (वैतागून) झाली... मोडता घालायला सुरुवात झाली तुझी...

आई : (चिडून) ‘चित्रकलेच्या क्लासला जाऊ नको’ असं म्हटलं का मी? फक्त घराजवळच्या क्लासला जा म्हटलं, त्यात मी काय मोडता घातलाय? आधी खाऊन घे. मग पाहू.

मानसी : मला नाही भूक.

दृश्य : (मानसी पाय आपटत आत निघून जाते...)

आई : दिवसेंदिवस या मानसीशी बोलणं अवघड झालंय. (तेवढ्यात फोनची रिंग वाजते)

आई : हॅलो. हो, मी मानसीची आई बोलते. कोण? पल्लवी का? थांब हं. देते मानसीला... मानसीऽऽ फोन आहे तुझा.

पल्लवी : मानसी, रविवारी दुपारी सिनेमाला जाऊया का? मैत्रेयी, केतकी, शर्वरी, शमिका, सोनिया सगळ्या येणार आहेत. माझा दादा सिनेमाची तिकिटे काढून देणार आहे.

मानसी : सायली येणार आहे का?

पल्लवी : नाही येणार. तिला तिचं नवीन चित्र पूर्ण करायचंय गं...

मानसी : मग मी नक्की येईन. done. रविवारी भेटू दुपारी.

आई : कुठे भेटताय? कधी? कशाला? किती वेळ लागणार?

मानसी : (घोषणा केल्यासारखे) रविवारी दुपारी सिनेव्हिजन *थिएटरवर* आमचा शाळेचा *ग्रुप* सिनेमा बघायला जमतोय होऽऽऽ... हुश्श..

आई : बरं झालं... मलाही दुपारी भिशीला जायचेय.

प्रवेश ५ : सिनेमा थिएटर

दृश्य : (थिएटरच्या बाहेर मुलींचा घोळका... निखिल सर येताना दिसतात.)

सोनिया : अय्या! सर तुम्ही? आत्ता? इथे सिनेमाला? तुम्ही बघता सिनेमा ? एकटेच आलात?

सर : अरे, हो, हो, एकदम प्रश्नांची सरबत्ती..

मानसी : शाळेच्या बाहेर कधी दिसला नाहीत ना... म्हणून आश्चर्य वाटलं.

सर : (हसत) शाळेशिवाय सुद्धा मी बाहेर पडतो आणि एकटा नाही बरं का... थांबा तुमची ओळख करून देतो... ‘प्रतिमाऽऽ जरा इकडे येतेस?’

गुरे गेली घरोघर, खूण खुरांची मातीत । चमचमती काजवे दोन्ही बाजूंनी फांदीत ।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : प्रमोद करण सेठी (१९८१) - गट नेतृत्व

प्रायोजक - डॉ. प्रियदर्शी सावंत, बोरीवली

प्रतिमा : (हसत) *हॅलो...*

सर : ही प्रतिमा... माझी होणारी पत्नी. आणि प्रतिमा– या माझ्या शाळेच्या विद्यार्थिनी.

प्रतिमा : आज सगळ्या मिळून एकत्र सिनेमा बघणार तर... वा ! छान !! मजा करा. भेटू मग नंतर... उशीर होतोय ना...

सर : चला, तुम्हाला पण पाहायचाय ना सिनेमा?

सर्वजणी : हो तर...

(मध्यंतरात)

केतकी : ए, सरांची बायको काय गोड दिसते.

पल्लवी : तिला खळीसुद्धा किती छान पडते नाही? प्रतिमाताई अगदी सरांना शोभून दिसते.

मानसी : (रागावून) त्यात काय? माझ्याही गालाला खळी पडते. खळीचं काय विशेष?

शर्वरी : असं कसं... छानच आहे प्रतिमाताई.

मानसी : मैत्रेयी, माझं डोकं दुखंतय. मी घरी जातेय. मला नाही पाहायचा यापुढचा सिनेमा. या मुली अशक्य आहेत.

सर्वजणी : असं काय मानसी? आम्ही काय केलंय? एकदम काय झालं डोकं दुखायला? विनोदी तर सिनेमा आहे.

मैत्रेयी : ए, दुखत असेल तिचं डोकं. मी घरी घेऊन जाते तिला. तुम्ही नका काळजी करू. तुम्ही आत जाऊन बसा. मध्यंतरानंतरचा सिनेमा सुरू झाला असेल.

मानसी : *Thank you,* मैत्रेयी.

मैत्रेयी : (एकटक तिच्याकडे बघत) मला माहित्येय, तुझं डोकं का दुखतंय ते... मानसी, उगीच वेडे विचार करू नकोस...

मानसी : (गलबलून) अगदी खरं आहे, अगं प्रतिमाताईला बघून माझं सिनेमात लक्षच लागत नव्हतं. मैत्रेयी माझ्या डोकेदुखीचं कारण बरोब्बर जाणलंस तू! हे फक्त तूच समजू शकतेस. मला अजून एका गोष्टीची कबूली द्यायचीय... तुझ्यापाशी.

मैत्रेयी : (प्रश्नार्थक नजरेनं) सायलीच्या चित्राविषयी...??

मानसी : हो ऽऽऽ

मैत्रेयी : कुठं लपवलंस चित्र?

मानसी : (अपराधीपणाने) वर्गात शास्त्रज्ञांच्या फोटोफ्रेम मागे... मधल्या सुट्टीत... तुम्ही सगळ्याजणी डबा खायला गेल्यावर... मैत्रेयी मी चुकले. मला मान्य आहे, मी चुकले...

मैत्रेयी : (शांतपणे) आता फक्त मी सांगते ते कर. नामजोशी सरांना हे सर्व सांगायचं... अगदी सोमवारीच.

मानसी : कसं सांगू त्यांना? माझी मलाच लाज वाटते...

मैत्रेयी : (डोक्यावर थोपटत) सर्व काही ठीक होईल विश्वास ठेव. चला घरी जाऊया.

प्रवेश ६ : अध्यापक कक्ष

दृश्य : (शाळा सुटलेली. निखिल सर अध्यापक कक्षात वह्या तपासत बसलेले असतात.)

मानसी : (घाबरत) सर, आत येऊ?

निखिल सर : (हसत) ये, ये मानसी, हातात काय आहे? हरणाचं चित्र? सायलीचं?

मानसी : तुम्हाला कसं कळलं? मैत्रेयी भेटली होती?

सर : हो. ती सायलीचं चित्र सापडलंय म्हणाली.

मानसी : (खाली मान घालून) सर, माझं चुकलं.. खूपच चुकलं. तुम्ही द्याल ती शिक्षा मला मान्य आहे. माझ्या आईला खूप वाईट वाटेल; पण इलाज नाही. कारण मी कृत्यच तसं केलंय. मी सायलीचीही माफी मागणार आहे.

सर : (हसत) झालं बोलून? का अजून काही शिल्लक आहे?

मानसी : सर, मला बोलायला तोंडच नाहीये; कुठल्या तोंडानं बोलू?

सर : मानसी, तुझं चित्र खराब होतं; हे तुला कोणी सांगितलं? तू पुढच्या वेळी अधिक प्रयत्न केलास, तर सायलीपेक्षासुद्धा तुझं चित्र चांगलं होईल. अर्थात त्यासाठी विषयाची आवड अन् मेहनत घ्यायची तयारी मात्र हवी. तू तिचं एक चित्र लपवशील; पण तिच्या बोटातल्या

अशा बोचऱ्या थंडीत, रानेवनेही गोठली। सूर्य येता उदयाला, हळूहळू जागी झाली।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : चंडी प्रसाद भट्ट (१९८२) - गट नेतृत्व

प्रायोजक - श्री. सौरभ सुधीर दप्तरदार, पुणे

जादूला तू लपवून ठेवू शकणार आहेस का? त्यापेक्षा तिच्या बोटातली जादू तुझ्या बोटात कशी उतरेल, ते तिच्याकडूनच शिकून घे. मग बघ, दोघींचीही चित्रं प्रदर्शनात लागतील. हो की नाही?

मानसी : खरंच, जमेल मला ते?

सर : का नाही जमणार? अजून एक गोष्ट नीट ऐकायची. आत्ता माझे फक्त शब्द लक्षात ठेवायचे, अर्थ तू मोठी झाल्यावर तुला कळेल.

मानसी : 'अजून' मोठी झाल्यावर का?

सर : (हसत) हो-हो, 'अजून' मोठी झाल्यावर!! आयुष्यातल्या अजून बऱ्याच रंगांशी तुझी नीट ओळख व्हायचीय. ते रंग तुला ओळखता आले- कळले की मग आपल्याला नक्की काय हवं आहे, आपली आवडनिवड काय आहे, हे सुद्धा तुला उमजेल.

सर : (टिचकी वाजवून) कुठं लक्ष आहे मानसी? काय काही येतंय का लक्षात माझ्या चिमुरड्या मैत्रिणीच्या?

मानसी : सर, मी चिमुरडी नाही. मी 'मोठ्ठी' आहे.

सर : खरंच की! चुकलंच माझं !! पळा आता; नाहीतर घरी जायला उशीर होईल.

प्रवेश ७ : मानसीचं घर

दृश्य : (बेल वाजते. आई अधीरपणे दार उघडते.)

आई : (काळजीने) अगं मानसी, किती उशीर शाळेतून यायला.

मानसी : (स्वत:शी हसत) आई उशीर होणार होता लक्षात यायला; पण मैत्रेयीमुळे वेळेवर... *थँक यू मैत्रेयी...*

आई : अगं काय पुटपुटतेस? स्पष्ट बोल.. काही अर्थ लागत नाहीये मला.

मानसी : (गळ्यात हात घालत) अगं माझी प्रिय-प्रिय आई, तू सांगशील त्याप्रमाणे उद्यापासून रोज तेल लावून चापून चोपून मी दोन वेण्या घालणार आहे. एवढाच त्याचा अर्थ...

•••

- शिल्पा कुलकर्णी
सी-२०४, पाटे संस्कृती, तुळशीबागवाले कॉलनी,
सहकारनगर क्र. २, पुणे 411009

सहभागी होताय नं...

छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा : २०१४-१५

(इ. ७वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी) स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही.

* **ध्वनिफीत स्पर्धा** (३० मिनिटांची, ४ ते ६ जणांचा गट) * **व्हिडिओ क्लिप स्पर्धा** (३ ते ४ जणांचा गट)
वरील दोन्ही स्पर्धांचे साहित्य सीडी/डीव्हीडी च्या रूपात छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयात पाठवावे.

* **'तुम्हीच संपादक व्हा!' हस्तलिखित स्पर्धा** (५ ते ८ जणांचा गट) **हस्तलिखित पृष्ठसंख्या ५० ते ५५.**

सर्व स्पर्धांची नोंदणी छात्र प्रबोधनच्या ई-मेलवर अथवा पत्राद्वारे ३१ डिसें. २०१४ पूर्वी करणे आवश्यक.

सर्व स्पर्धांसाठीचे साहित्य पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०१५

अधिक तपशील छात्र प्रबोधन दिवाळी अंकामध्ये पाहा.

दीस सुगीचे चंदेरी, उगवती मावळती। सांजसकाळी आभाळी, सूर सोन्याचे सांडती।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : मणिभाई देसाई (१९८२) - सार्वजनिक सेवा

प्रायोजक - श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड -पुणे

अडचण आणि समस्या यातील सीमारेषा

– संहिता करमळकर

छात्र प्रबोधनच्या दिवाळी विशेषांकापासून (सौर कार्तिक १९३६, नोव्हेंबर २०१४) 'समस्या परिहार' ह्या विषयावर लेखमाला सुरू झाली आहे. समस्या म्हणजे काय? त्या सोडवण्याच्या पायऱ्या, समस्येकडे पाहण्याचा दृष्टिकोन यांविषयी तुम्ही तपशीलात जाणून घेतले असेलच. वाचूया त्या लेखमालेतील पुढील लेख...

तुम्ही सगळ्यांनी कोळ्याचं जाळं नक्कीच पाहिलं असेल. ते कसं एकमेकांत गुंतलेलं असतं; अगदी जटील. त्याचप्रमाणे तुम्ही एका रांगेत चालणाऱ्या मुंग्याही पाहिल्या असतील. मुंग्याच्या वाटेत जर एखादा दगड आला, तर लगेच त्या मुंग्या दगडाला वळसा घालून पुढे जातात. मुंग्यांच्या वाटेतील त्या अडथळारूपी दगडाला आपण 'अडचण' म्हणू शकतो. अडचणीवर बऱ्याचदा आपल्याला त्वरित उत्तर शोधून झटपट कृती करावी लागते. पण अत्यंत जटील, एकमेकांत गुंफलेल्या कोळ्याच्या जाळ्याला आपण 'समस्या' म्हणू शकतो. समस्येला मात्र, कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे अनेक पदर असतात. म्हणजेच काय, तर समस्या ही अडचणीपेक्षा जास्त गुंतागुंतीची असते.

समस्या कोणत्याही प्रकारची असो वा समस्येमागचे कारण कुठलेही असो; आपली पहिली अगदी नैसर्गिक प्रतिक्रिया ही भीतीची किंवा बिचकण्याचीच असते. तसं असण्यात काही गैरही नाही, बरं का! हळूहळू मात्र, या भीतीचं रूपांतर ताणात व्हायला लागतं. काही वेळा तर आपल्याला असंही वाटतं की 'माझी समस्या ही जगातील सर्वात अवघड समस्या आहे.' त्याच्यावर उत्तर शोधून काढणं अशक्यच आहे. थोडक्यात काय, तर आपण लहान-मोठे सर्वच जण समस्यांमध्ये अडकल्यावर भीती, चिंता, ताण, उदासीनता अशा विविध भावनांमध्ये हिंदकळतो. बऱ्याचदा या भावना इतक्या तीव्र असतात, की आपली विचार करण्याची क्षमता कामीच येत नाही. तर्कशुद्ध विचार न करता आल्यामुळे मग समस्येवर उपाय शोधताना अडथळे निर्माण होतात. अशा परिस्थितीत आपण स्वत:ला किंवा परिस्थितीला दोष द्यायला लागतो.

आपण आपल्या स्वभावानुसार समस्येला प्रतिक्रिया देतोच. पण मग प्रश्न असा पडतो, की समस्या नेमकी ओळखायची तरी कशी? समस्या ओळखण्यातील महत्त्वाची पायरी म्हणजे आपली स्वत:बद्दलची जाणीव आपल्याला होणं. समजा, आपले आपल्या जिवलग मित्राशी किंवा मैत्रिणीशी भांडण झालं. अशावेळी आपण आपल्या मनात डोकावून पाहायचे. त्यावेळी आपल्या स्वत:च्या मनात कुठले विचार, भावना उत्पन्न होतात हे जाणून घ्यायचे. त्यावरून ती अडचण आहे की समस्या हे आपण ठरवू शकतो. बऱ्याचदा आपण साशंक अथवा गोंधळलेल्या मन:स्थितीत असलो; तर आई-वडिलांशी, शिक्षकांशी, एखाद्या अगदी जवळच्या नातेवाईकांशी अथवा मित्राशी संवाद साधून समस्येचा सखोलपणे विचार करू शकतो.

बऱ्याचदा समस्या कितीवेळा व किती तीव्रतेनं भेडसावते, यावरून तिचा अंदाज बांधता येऊ शकतो. उदाहरणार्थ – भरपूर अभ्यास करूनही जर परीक्षेत काही आठवत नसेल, तर असं प्रत्येक परीक्षेत घडतं का? ऐनवेळी न आठवल्यामुळे मार्कांमध्ये किती फरक पडतो? असाही विचार करता येईल.

बऱ्याचवेळा एखाद्या समस्येमुळे आपल्या कार्यक्षमतेत फरक पडतो. उदा. एखाद्या मुलाला लोकांमध्ये

हिरव्या पिवळ्या माळरानी, मावळतीची संध्याराणी। पसरवूनी पाहा चालली, चमचमती सांज सोनेरी।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : अरुण शौरी (१९८२) - पत्रकारिता, साहित्य आणि कला

प्रायोजक - श्री. निखिल धारवाडकर, बंगलोर

मिसळताना, लोकांशी बोलताना आत्मविश्वास वाटत नाही. त्यामुळे तो शाळेत, क्लासला किंवा कौटुंबिक समारंभाला जाणं टाळत असेल, तर त्यामुळे त्याच्या दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण होतात. अशा समस्येवर जरूर विचार व योग्य ती कृती व्हायला हवी.

कोणतंही उत्तर शोधण्याच्या आधी समस्येमागच्या कारणांचा सखोल विचार करावा लागतो. अडचणींच्या बाबतीत मात्र बऱ्याचदा असं होतं, की योग्य ती कृती केली की अडचण संपते. याउलट समस्या सोडविताना खूप धीर धरावा लागतो. दीर्घकाळ प्रयत्न करत राहावे लागतात. एका रात्रीत जादू झाल्यासारखा प्रश्न सुटत नाही. एक गोष्ट मात्र जरूर लक्षात ठेवली पाहिजे, की एखाद्या गोष्टीकडे आपण अडचण म्हणून दुर्लक्ष करत राहिलो; तर अशा अनेक अडचणी एकत्र येऊन मोठी समस्या नक्कीच बनू शकते. उदाहरणच द्यायचं झालं, तर रिक्षा/बस न मिळाल्यामुळे क्लासला जायला उशीर होतो. ही एक छोटीशी अडचण आहे, असं समजून जर त्याकडे आपण दुर्लक्ष करीत राहिलो, तर कदाचित सगळीच कामे उशिरा करण्याची आपल्याला सवय लागेल. त्यातून मोठी समस्या उत्पन्न होऊ शकते.

एकूणच काय तर समस्या आणि अडचण यातील सीमारेषा तशी अंधुकच आहे. त्यामुळे समस्या किंवा अडचणीतून मार्ग काढताना आपल्याला स्वत:बद्दल आणि परिस्थितीबद्दल शिकायला मात्र खूप मिळते हे नक्की.

तुम्ही दैनंदिन जीवनात अनुभवत असलेल्या काही प्रातिनिधीक समस्यांची यादी खाली दिलेली आहे. या समस्या तुम्ही कमी-अधिक प्रमाणात अनुभवत असाल किंवा काही तर कधीच अनुभवल्याही नसतील. या समस्यांना तुम्ही **० ते ३** असे गुण द्यायचे आहेत. हे गुण तुम्ही ती समस्या किती तीव्रतेनं अनुभवत आहात, ते दर्शवेल.

- कधीच न अनुभवलेली समस्या – ०
- थोड्या प्रमाणात अनुभवलेली समस्या – १
- त्याहून जास्त प्रमाणात अनुभवलेली समस्या – २
- खूप जास्त प्रमाणात अनुभवलेली समस्या – ३

अ) शैक्षणिक समस्या

* अभ्यासाची इच्छा न होणे –
* एखादा विषय खूप अवघड वाटणे –
* अभ्यासाची पद्धत न कळणे –
* करिअर निवडीबाबत मनात गोंधळ असणे –

ब) शालेय/महाविद्यालयीन समस्या

* इतर विद्यार्थ्यांकडून दिला जाणारा त्रास – (उदा. थट्टामस्करी, *रॅगिंग* इ.)
* मित्रमैत्रिणींच्या दबावाखाली येणे –
* अभ्यासातील स्पर्धा व त्यामुळे येणारा ताण –
* शिक्षकांची भिती –

क) कौटुंबिक समस्या

* घरातील एखाद्याचे आजारपण –
* घरातल्यांशी न पटणे –
* भावंडांमधील स्पर्धा, तुलना –

ड) भावनिक समस्या

* आत्मविश्वास नसणे –
* एकटेपणा वाटणे –
* भावनांचा असमतोल –
* राग अनावर होणे –
* शारीरिक बदलांमुळे येणारा तणाव –

या चाचणीद्वारे तुम्हाला तुमच्या समस्या व त्यांच्या तीव्रतेची जाणीव होईल. जसजशी समस्येची तीव्रता वाढत जाते, तसतसा तुम्हाला त्या समस्येबद्दल सखोल विचार, कुटुंबातील मोठ्यांशी सल्लामसलत, त्यानुसार योग्य कृती गांभीर्याने करणं गरजेचं आहे, असे सूचित करते. या समस्या सोडूनही तुमच्या अन्य काही समस्या असू शकतात. त्या एका ठिकाणी नोंदवून ठेवा व त्यांनाही गुण द्या.

•••

– संहिता करमळकर
५/४०, 'अद्वैत', तपोधन सोसायटी,
शाहू कॉलेज रोड, पर्वती, पुणे – ९

निळे स्वच्छ आकाश, थेंबाथेंबात प्रतिबिंबित होते। क्षितिजावर उमलणाऱ्या पहाटेसारखी, एक वाट उलगडत जाते।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : रसिपुरम्‌लक्ष्मण (१९८४) - पत्रकारिता, साहित्य आणि कला

प्रायोजक - श्री. अजित कानिटकर, पुणे





आणि आम्ही देखील पेब सर केला...

दरवर्षी सुट्टीत मी, आई, बाबा किल्ले पाहायला जातो. यावर्षी आमच्याबरोबर माझ्या इतर मित्रांनाही किल्ला पाहायला नेण्याचं ठरवलं. एकेकाला सांगता सांगता ह्याच्या-त्याच्या ओळखीतले मिळून इ. चौथी ते बारावीची तीस मुलं गोळा झाली. किल्ल्यावर घेऊन जाण्यासाठी बाबांचे मित्र व जुने जाणते *ट्रेकर* व छायाचित्रकार यांनी सर्व जबाबदारी घेतली. पेबसारखा फार कमी लोकांना माहीत असलेला किल्ला आम्हाला पाहायला मिळणार, हे ऐकून मला आनंद झाला. पेबला जाण्यासाठी आम्ही डोंबिवली स्थानकातून पहाटेची कर्जत गाडी पकडून नेरळ स्थानकात उतरलो. स्थानकावर सर्वांची ओळख झाली व आमचे गट पाडले. आमच्या गटाचे नाव *'टायगर'* होते. तेथून आम्ही टेम्पोनं वॉटर पाईप या स्थानकावर उतरलो. नंतर माथेरानच्या छोट्या गाडीच्या रुळावरून आम्ही एक तास चालल्यावर, जिथं पेबला जाणारी पायवाट लागते; तिथं विश्रांतीसाठी थांबलो. तेथून पाहिलं, तर उजव्या बाजूला माथेरानचा झाडीनं भरलेला डोंगर, समोर प्रबळगड, डावीकडे पेबचा किल्ला, मागे माथेरानचा *पॅनोरमा पॉईंट* अशी ठिकाणे दिसत होती. अशा निसर्गरम्य वातावरणात रुळावर बसून आम्ही आमचे डबे खाल्ले.

आतापर्यंतची वाट अतिशय सोपी होती. यापुढे चढ-उताराची खडतरवाट व दोन शिड्या पार करायच्या होत्या. खाऊन ताजतवानं झाल्यावर शिवाजीमहाराजांचा जयघोष करत माथेरानचा डोंगर उतरायला सुरुवात केली. लवकरच पहिली शिडी लागली. मनाचा हिय्या करून आम्ही ती शिडी उतरलो; पाहातो तर पुढची वाट

दाट धुक्याचा सागर पसरे, व्यापुनि टाकी दरीदरी। दाही दिशांना पसरे अन् तो आकाशा भिडे वरी।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : बाबा उर्फ मुरलीधर आमटे (१९८५) - सार्वजनिक सेवा

प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई

अधिकच खडतर होती. एका बाजूला उंच डोंगर तर खाली खोल अक्राळविक्राळ दरी. चालताना प्रत्येक पाऊल जपून टाकावे लागे. हा कठीण टप्पा पार केल्यावर माथेरानचा डोंगर व पेबच्या डोंगरामधील 'व्ही' आकाराच्या घळीत उतरलो. तिथं खूप जोरात वारा वाहात होता. स्वत:चा व पाठीवरील सॅक याचा तोल सांभाळत आमची सेना पेबच्या किल्ल्याला भिडली.

आता आम्ही पेबचा किल्ला चढायला सुरुवात केली. रस्त्यात आम्हाला 'नेढं' दिसलं. नेढं म्हणजे डोंगराच्या दगडी भिंतीला पावसानं व वाऱ्यानं झीज होऊन भोक पडणं. पुढे लवकरच दुसरी शिडी लागली. ती पार केल्यावर आम्ही किल्ल्यावर महादेव मंदिरात गेलो. तेथे पेबी देवीची अष्टभूजा मूर्तीही आहे. बाजूला दगडात खोदलेली टाकी आहेत. त्या टाक्यावरील पाणी थंडगार व चविष्ट आहे. महादेव मंदिरातील आश्रमात आम्ही आमचे सामान ठेवले. थोडा वेळ विश्रांती घेऊन किल्ला पाहाण्यासाठी बाहेर पडलो. किल्ल्याची निशाणी असलेला एकमेव बुरूज आश्रमासमोर आहे. किल्ल्यावर अनेक गुहा आहेत. गुहेकडे जाताना राजवाड्याचे चौथरे आहेत. पुढे गेल्यावर सुकलेलं पाण्याचं टाकं आहे. त्याच्या बाजूला उतरायला शिडी आहे. शिडी उतरल्यावर आम्ही एका प्रशस्त नैसर्गिक गुहेत पोहोचलो. तेथे समर्थांचा मठ आहे. या नैसर्गिक गुहेशिवाय अनेक गुहा कातळात खोदल्या आहेत. त्यातील काही गुहेत पाण्याची टाकी आहेत. गुहेत असल्यामुळे टाक्यातील पाण्याचे वाऱ्याने व सूर्य प्रकाशामुळे बाष्पीभवन होत नाही. त्यामुळे टाक्यात बारामाही पाणी टिकते. शत्रूने हल्ला केल्यावर अशा बारामाही पाण्याच्या टाक्याच्या जोरावर किल्ला लढवता येतो. या प्रकारची पाण्याची टाकी सातवाहनकाळात कातळात खोदली जात असत. या टाक्यातील पाणी दगडातून पाझरत असल्याने जमिनीतील क्षार त्यात विरघळतात शिवाय ते थंडही असते. या टाक्यावरून किल्ला किती जुना आहे हे ओळखता येते.

आम्ही सर्वजण गुहेत बसल्यावर आम्हाला किल्ल्याची माहिती सांगण्यात आली. पेबी देवीमुळे किल्ल्याला पेब नाव पडले. याचे दुसरे नाव 'विकटगड' आहे. इतिहासकाळात या किल्ल्याचा उपयोग टेहळणीसाठी करायचे. या पेब किल्ल्यावरून प्रबळगड, म्हसमाळ, चंदेरी, मलंगगड व त्यांच्या मध्ये असलेला प्रदेश दिसतो. दुसऱ्या बाजूला नेरळ गाव व आजूबाजूचा प्रदेश दिसतो. शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्यातील मोठ्या गुहेचा धान्य साठवण्यासाठी उपयोग करत. उरलेली दुसरी गुहा खूप अरुंद आहे. या गुहेत सरपटत जावे लागते. संजय आणि अजय काकांच्या मदतीने आत जाऊन विजेरीच्या साहाय्याने ती गुहा पाहिली व शिडी चढून परत महादेव मंदिरातील आश्रमात परतलो.

नंतर किल्याच्या सर्वोच्च स्थानावर असलेल्या दत्तपादुका पाहून किल्ला उतरायला सुरुवात केली. आणि परतीचा प्रवास करून रात्री घरी पोहोचलो. अशाप्रकारे आमचा एक दिवसाचा सुंदर आणि माहितीपूर्ण ट्रेक पूर्ण झाला.

●●●

– कौस्तुभ सामंत (इ. ६ वी)
चंद्रकांत पाटकर विद्यालय, डोंबिवली

सूर्यबळ हाती तेजस्वी स्वीकारू। नव्या उमेदीने, नवे गोकुळ उभारू।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : लक्ष्मी चंद जैन (१९८९) - सार्वजनिक सेवा

प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे



भाकरीचं मोल

नीलेश स्वभावानं जरा आक्रमक मुलगा. तो आज जंगल भटकंतीसाठी मुलांच्या गटाबरोबर आला होता.

नुकताच पाऊस पडून गेल्यामुळे सगळं हिरवगार झालं होतं. ठिकठिकाणी भूछत्र्यांनी डोकी वर काढली होती. भरपूर रंगीबेरंगी फुलं वाऱ्यावर डोलत होती. मातीचा सुगंध नाकात दरवळत होता. सगळं वातावरण प्रसन्न झालं होतं. नीलेशच्या बरोबर जी मुलं आणि सर आले होते, त्यांचे हास्य विनोद चालू होते. दुपारच्या कडक उन्हाचा लवलेशही जाणवत नव्हता. चालताना त्यांना थोडीशी मोकळी जागा लागली. चालून-चालून दमल्यामुळे सगळ्यांच्या पोटात कावळे ओरडत होते. सर्व डबे खायला बसणार होते. सरांच्या सूचनेनुसार सर्वांनी थोडा कमीच डबा आणला होता. कारण आज सरांकडून खाऊ मिळणार होता. सरांनी यावेळी काय आणले असेल त्याची सर्वांनाच उत्सुकता होती. सरांनी दोन मुलांना हाताशी धरून पिशव्या उघडल्या आणि भाकऱ्या बाहेर काढल्या. एका डब्यातून झुणका काढला. त्याबरोबर मिरची-लसणीचा ठेचा होता. प्यायला तिथल्याच विहीरीतलं पाणी आणलं.

''ईऽऽ भाकरी काय, शी... मी तर फक्त माझ्या डब्यातलं चीज सँडवीच खाणार,'' नीलेशनं जाहीर केलं. सरांनी दिलेली भाकरी त्यानं अनिच्छेनं झाडामागे फेकून दिली. स्वत:चा डबा उघडून नीलेशनं सँडवीच खायला सुरुवात केली. सरांनी पाहिलं; पण तेव्हा ते काहीच बोलले नाहीत.

पोट भरल्यामुळे मुलांना आता तरतरी आली. विश्रांतीनंतर मुलं भटकंतीला पुन्हा सज्ज झाली. मुलांचे वेगवेगळे गट केले गेले. भटकंतीसाठी ते गट वेगवेगळ्या ठिकाणी पांगले. एके ठिकाणी थांबत सर म्हणाले, ''शांत राहा आणि तिकडे पाहा.'' समोर हरणांचा कळप होता. त्यांचे ते नितळ डोळे, ती कोमल काया, आहाहा !! सगळेच हरखून गेले. आवाजामुळे हरणं सावध होऊन पळत सुटली तसा नीलेशही बेभान होऊन त्यांच्या मागे पळत सुटला.

जेव्हा लक्षात आलं, तेव्हा नीलेश एकटाच चालत होता. तो गटातून बाजूला पडला होता. आता त्याला रडू येत होतं. तो बिचारा हरवला होता. त्याला त्याच्या मित्रांची, सरांची सारखी आठवण येत होती. नीलेशनं इकडे-तिकडे पाहिलं, तर एक मुलगा त्याच्याकडे रोखून पाहत होता. राजन नाव होतं त्याचं. सुदैवानं त्यालाही मराठी भाषा येत होती. आता राजनच नीलेशला वाचवणार होता. फाटक्या कपड्यातल्या हा मुलगा मनानं चांगला होता. सर्वांना शोधत फिरताना राजननं निलेशला अनेक फुलं, फळं, पक्षी दाखवले. त्यांची वैशिष्ट्ये, बारकावे सांगितले. राजनला एवढं कसं माहिती, याचं नीलेशला राहून राहून आश्चर्य वाटत होतं.

एके ठिकाणी राजननं नीलेशला त्याची झोपडी दाखवली. जेवून बराच वेळ झाला होता. नीलेशच्या पोटात आगडोंब उसळला होता. पायपीटही बरीच झाली होती. राजननं त्याच्यासाठी नाचणीची भाकरी आणि चटणी आणली. नीलेशच्या एका बाजूला न आवडणारी भाकरी होती तर दुसऱ्या बाजूला प्रचंड भूक. नीलेशच्या डोळ्यांत टचकन पाणी तरळलं; पण भूकेपुढे सर्वकाही व्यर्थ म्हणतात तेच खरं! चार भाकऱ्या आणि भरपूर पाणी प्यायल्यावर त्याचा आत्मा शांत झाला. तो झोपडीबाहेर आला. तेवढ्यात समोरच्या झुडपातनं मिहीरचं डोकं वर आलं. हळूहळू सर्वच गट त्याला दिसला. नीलेशच्या शोधात सर्वजण झोपडीपाशी येऊन पोहोचले. आता नीलेशच्या आनंदाला पारावार उरला नाही. तो बेभान होऊन राजनचे आभार मानून गटाकडे पळत सुटला. आज कोणीही काहीही न शिकवता निलेश खूप काही शिकला होता.

•••

– शार्दूल फाटक (इ. ८वी)
रामनीलय इमारत, पी. जोग. क्लासजवळ, सदाशिव पेठ, पुणे ३०

साऱ्या रंगावर आली एक सोनेरीशी झाक। भिडे काळजाला थेट, निळ्या क्षितिजाची हाक ।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते : के सुबान्ना (१९९१) - पत्रकारिता, साहित्य आणि कला

प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिस्टन, अमेरिका

थंडी

थंडीला मी का आवडते?
मला सारखी बिलगून बसते ..
घरात-बाहेर जिकडे तिकडे
माझ्या मागे-मागे येते ! ।।१।।

कोठुनी येते,
मला कवळते
थंडगार बर्फाचे हात ते
मी बर्फाचा गोळा होते...! ।।२।।

पोटामध्ये जणू शेकोटी
तोंडामधूनी निघतो धूर
थंडी बघते गंमत माझी
उभी राहूनी थोडी दूर ...! ।।३।।

कोवळे कोवळे पिवळे पिवळे
अंगणात हळूच येते ऊन
मी घेता ऊन पांघरुन
थंडी जाते दूर पळून ..! ।।४।।

ऊन म्हणते थंडीला
''मला कशी गं घाबरतेस?
मी अंगणात येता क्षणी
कोपऱ्यात कशी दडून बसतेस?'' ।।५।।

थंडी काहीच बोलत नाही
मनीसारखी राहते लपून
ऊन कधी जाईल म्हणून
नजर ठेवून बसते टपून..! ।।६।।

घातला स्वेटर, कानटोपी
तरी थंडी काही हटत नाही
शेकोटी समोर बसले तरी
तिची मिठी सुटत नाही..! ।।७।।

मारल्या उड्या, घातल्या फेऱ्या
कुठून कशी पण आली उब
मीच म्हणाले, मला खुशीत,
''थंडी पळाली, बहोत खूब !'' ।।८।।

– डॉ. प्रदीप आवटे
सी - १०४, सुवर्णरत्न गार्डन सोसायटी,
कर्वेनगर, पुणे 411052

पाणथळीत भाताच्या, पाहा फूल-ऊन नाचे। ऐक चांदीची चाहूल, चाळ वाजती सुगीचे।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : रवी शंकर (१९९२) - पत्रकारिता, साहित्य आणि कला

प्रायोजक - श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

मातीचं माहेर

– सुनील शिनखेडे

मित्रांनो, परवा खूप मज्जा आली. आमचे पेठकर काका आहेत ना, त्यांनी बोलावलं म्हणून त्यांच्या शेतावर गेलो होतो. शहरातच कमळ तलावाकाठच्या उद्यानाजवळ त्यांचं शेत आहे. शेत मस्त मजेशीर. उद्यानाच्या आतल्या कप्प्यातलं, नजरेच्या टप्प्यातलं. मोठमोठ्या वृक्षभिंतींनी वेढलेलं. झऱ्याचा मोठ्ठा आड, पाण्याचे झुळझुळते पाट, ओली-हिरवी वाट आणि काळ्या मातीचा थाट! त्यांच्या शेतात सर्व प्रकारची मोसमी फळं तर आहेतच; पण मोहरीपासून ज्वारीपर्यंत आणि बांबूपासून बहाव्यापर्यंत सारी नवलाई आहे. आज त्यांनी शेतात बोलावलं होतं ते फुलपाखरं बघायला. आहे की नाही गंमत? आपल्या शेतात त्यांनी शंभर प्रकारची शेकडो फुलपाखरं आणली आहेत. त्या फुलपाखरांना आवडणाऱ्या वनस्पती मुद्दाम लावल्या आहेत. फुलपाखरांची ही रंगीबेरंगी दुनिया बघायला मी तिथं गेलो आणि आगळ्याच जगात हरवलो. क्षणात माझ्या अंगाखांद्यावर, फुलपाखरं येऊन बसली. माझं जणू झाड झालं ! थोड्या वेळानं मला वाटलं की, मलाच पंख फुटले आहेत !

मी पोहोचण्याआधीच तिथं गोपाळांचा मेळा जमला होता. एकमेकांच्या अंगावरची फुलपाखरं पकडण्यासाठी आमचा पाठशिवणीचा खेळच तिथे सुरू झाला. तो खेळ खेळताना मी चाळीस वर्षं मागं गेलो. त्या मुलांएवढा झालो...

... मला माझं बालपण आठवलं. गावातलं. मला मित्र खूप आवडायचे. आम्ही खूप धम्माल करायचो. तेव्हाचं सगळंच निराळं होतं. तेव्हाचे सगळे ऋतू नीट कळायचे. सांगता यायचे, अनुभवता यायचे. गावाच्या चार दिशांना चार तलाव आणि हिरवी रानं होती. कोट तलावात शिंगाड्याचे वेल असायचे. या वेली एकसंधपणे पाण्यावर आच्छादलेल्या असत; पण जमिनीवर प्लॉट पाडतात तसे कोळी बांधवांनी संपूर्ण तलावातील वेलींचे प्लॉट पाडलेले असत. या वेलींना खाली शिंगाडे लागतात. पाण्यावर त्याची नुसती पानंच दिसतात. कोळी बांधव लाकडी होडीतून तलावात जायचे. आधी पानांखालचे शिंगाडे काढायचे. एकदा मी मित्रासोबत होडीत बसून तलावात सैर करून आलो. शिंगाडे कुठे, कसे लागतात ते बघून थोडे सोबत घेऊनही आलो होतो.

दुसरा तलाव बारई तलाव. त्याच्यालगत पानमळे होते. पान म्हणजे नागवेलीचं पान- विड्याचं पान. द्राक्षवेलींसारखेच नागवेलींचेही मंडप असतात. नागवेलींचे हे पानमळे म्हणजे हिरवेगार नैसर्गिक फ्रीजच जणू! इतर दोन तलावांचं पाणी शेतीसाठी वापरलं जायचं. या तलावापासून

पानोपानी अशोक झाडे लालतुरे मिरविती। चराचरातुनी चैतन्याच्या शतधारा झरती॥

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार : बानू जहांगीर कोयाजी (१९९३) - सार्वजनिक सेवा

प्रायोजक - श्री. विद्याधर जोगळेकर, पुणे

पुढे मैलभर अंतरावर गावाच्या वेशीवर देलनवाडी नावाची वस्ती होती. तिथं मारुतीचं मंदिर होतं. पायी किंवा सायकलवरून देलनवाडीची रपेट ही आम्हा मित्रांची चैन असायची. रस्त्याच्या दुतर्फा आंब्याच्या झाडांची थेट सोबत. आंब्याची झाडं मोहरली की, उन्हाळ्याची चाहुल लागायची. त्या त्या मोसमात आंबे, जांभळं, पेरू, चिंचा, बोरं, सीताफळं ही सगळी फळं गावठाणातच चाखायला मिळत. त्यासाठी रानात जावं लागायचं नाही. जसं फळांचं तसंच फुलांचं.

उन्हानं चांगलं भाजून काढलं की ताडताड करत पाऊस यायचा. गावातली बहुतेक घरं पत्र्याच्या छपरांची. पाऊस धोधो बरसायचा. कधी तर गारांचाही पाऊस पडायचा. पत्र्यावर पडणाऱ्या पावसानं घरातलं वातावरण सर्द व्हायचं. आमच्या घरात मागच्या दारी एक अडगळीची खोली होती. तिथं जळणासाठी वर्षभर लागणारा लाकूडफाटा साठवलेला असायचा. त्या लाकडांमध्ये दर पावसाळ्यात प्रचंड संख्येनं साप निघत. हे साप बिनविषारी होते; त्यामुळं कुणालाच काही वाटायचं नाही. आमच्या शेतावरचे सालगडी तर साप हातात पकडायचे. मी त्या खोलीत जाऊन सापांचा मुक्त वावर बघायचो.

पावसाळ्याचे दिवस म्हणजे सणांचे दिवस. नागपंचमी, राखीपौर्णिमा, गौरी-गणपती, पोळा आणि पाऊस सरतासरता देवीचं नवरात्र. गौरी-गणपतीसाठी पत्री गोळा करण्याचं काम आम्हा मुलांकडे असायचं. त्यानिमित्तानं विविध झाडांची, फुलांची ओळख व्हायची. फुलापानांचे रंग, गंध, रूप याची भुरळ पडायची मनाला. गोकुळाष्टमीला शेतातून चिकणमाती आणली जायची. त्या मातीचं गोकुळ तयार करायचो आम्ही. पोळ्याला मातीचे बैल पूजेसाठी! बैल शेतीत वर्षभर राबतात, धान्य पिकवायला त्यांची मदत होते. त्याबद्दल ही कृतज्ञता. पुढे सुगीच्या दिवसांत धरती खऱ्या अर्थानं ऋतंभरा होत असते.

पाऊस, थंडी, उन्ह, वारा - ऋतू कोणताही असू दे, तेव्हा

हवेत तरती विलीन होती श्वासांमधल्या वाफा। सरिता पायावरी तरंगे वाफांचा घन ताफा।।

अभिमानास्पद : आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते : किरण बेदी (१९९४) - सरकारी सेवा

श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे, सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

जगण्याला वेगळी, विलक्षण लय होती. याचं कारण अवतीभवतीचे सारेजण स्वत:साठी आणि स्वत:पुरतं जगत नव्हते. माणसाच्या जगण्याशी निसर्गाचं नातं घट्ट होतं. माणसाच्या रोजच्या जगण्यातून निसर्ग वेगळा काढताच येत नव्हता. संस्कृती आणि परंपरा यांनीही माणसाचं निसर्गाशी नातं तुटू नये, अशी खबरदारी घेतली होती... माझ्या बालमनावर निसर्ग उमटला तो असा. गावशिवारातला – शेतीमातीतला. माझ्या इवल्या डोळ्यांत आणि इवल्या मुठीत मावणारा. पुढं त्याची भव्यदिव्य रूपं पाहण्याचा आणि समजून घेण्याचा योग आला तरी त्या इवल्या मुठीतलं त्याचं बोट कधी सुटू दिलं नाही.

हायस्कूलमध्ये मी स्काऊट पथकात होतो. एकदा आमचं शिबिर गावापासून दूर रानात होतं. कापडी तंबू ठोकून त्यात राहायचं. दोन रात्री, दोन दिवस. अशा या शिबिरानं खूप शिकवलं. घरापासून दूर राहणं शिकवलं, स्वावलंबन शिकवलं आणि निसर्गाशी नातं जोडायलाही शिकवलं. जंगलातली सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र– सगळे प्रहर प्रत्यक्ष अनुभवायलाच हवेत. पक्ष्यांचा किलबिलाट, मोकळा वारा, ओढ्याचं झुळझुळ पाणी, तऱ्हेतऱ्हेची गर्द झाडी. पहिल्या रात्री झोप येत नव्हती. जागाच होतो. तंबूतून सहज बाहेर बघितले तर समोरच्या झाडावर हलणारा उजेड बघून घाबरलो. मित्राला उठवलं. तो म्हणाला, ''अरे घाबरतोस काय, ते काजवे आहेत.''

पुढं कधीतरी काजव्यांच्या शेपटाकडील भागात असलेल्या प्रकाशमान द्रव पदार्थाबद्दल आणि त्याच्या या वैशिष्ट्याबद्दल माहिती अभ्यासक्रमात झाली. परंतु त्याआधीच त्या उजेडाच्या झाडानं मनात भीतीयुक्त उत्कंठा निर्माण झाली होती.

कीर्र काळोखाचा अनुभव एकदा नागझिरा अभयारण्यात घेतला. तिथं संपूर्ण वातावरण जंगलाला पोषक राखण्याच्या निर्णयामुळे वीजपुरवठाच घेतलेला नव्हता. आजही नाही. वाघ, हरणं, रानडुकरं, नीलगायी, ससे, कोल्हे, अस्वल, माकडं आणि मोर... नागझिरा खूप समृद्ध आहे. पुढे मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा सर्व प्रदेशांतला निसर्ग मनात साठवला. सह्याद्रीचे खोरे असो की हिमालयातील पर्वतराजी, धीरगंभीर महानद्या असोत की तिन्ही बाजूंनी वेढलेला समुद्र किंवा गड– किल्ल्यांपासून लेण्यांपर्यंत आणि देवालयांपासून संग्रहालयांपर्यंत... आपण हे सारं डोळसपणे बघून हा नैसर्गिक आणि काही मानवनिर्मित असा ठेवा नीट जपायला हवा.

परवा मुक्तांगणच्या अनिल अवचट काकांच्या भाषणातलं एक वाक्य खूप भावलं. ते म्हणाले, ''अद्ययावत तंत्रज्ञानानं तुम्ही संगणक बनवाल; पण संगणकातून ज्वारी कधीच पिकणार नाही, बाहेर पडणार नाही. त्यासाठी मातीच हवी. म्हणूनच माणसाचे हात अवकाशाला, चंद्राला, मंगळाला टेकले तरी त्याने पाय जमिनीवर, मातीत रुजवलेलेच बरे.''

...अरे, फुलपाखरू होऊन भिरभिरताना मी पार चंद्रापर्यंत, मंगळापर्यंत जाऊन आलो. भानावर आलो तेव्हा माझे पाय मातीत छान भिजले होते. फुलपाखरं भिरभिरत होती अवतीभवती; पण सर्वांना भुका लागतील हे हेरून, पेठकरकाकांनी न्याहरीचा मस्त झकास बेत आखला होता. मक्याची कणसं, पेरू, डाळिंबं तर होतीच. सोबत गरमागरम भाकरी आणि मुगाची डाळ, मिरचीचा ठेचा, शेंगा चटणी ! ही सगळी त्यांच्या शेतात पिकलेल्या धान्याची निर्मिती. त्या न्याहारीवर ताव मारताना माझ्या मनात आलं, 'सावली देणारं माऊलीसारखं हे शेत म्हणजे मातीचं माहेरच नाही का?' अन्नपूर्णेच्या या मूळ रूपाला– मातीला मनोमन वंदन केलं. मन भारावलं होतं. त्यात विलक्षण काहीतरी रुजलं होतं, याची जाणीव झाली.

●●●

– **सुनील शिनखेडे**
कार्यक्रम अधिकारी, आकाशवाणी,
जुना कुंभारी मार्ग, एम्. आय.डी.सी.
सोलापूर 413006

इथे तिथे धुके छान दाटले किरण बाण। हिरव्याशा आवेगात थरारले पान पान।।

अभिमानास्पद : पांडुरंग आठवले (१९९६) - गट नेतृत्व

प्रायोजक - श्रीमती उमा परांजपे, पुणे

प्रतिसादी वाचकवीर व्हा... ८

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. छात्र प्रबोधनच्या वासंतिक अंकापासून (चैत्र/एप्रिल) त्या–त्या अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या छात्र प्रबोधनच्या अंकात देत असतो. **या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ जानेवारी २०१५ पर्यंत** 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

प्रश्नांची उत्तरे लिहा

१) 'काडी पेहलवान झाले हनुमान' ची किमया कशी घडली?
२) 'समस्या परिहार' या लेखमालेत अडचण आणि समस्या यांमधील भेद कसा स्पष्ट केला आहे?
३) 'सागर शिंपले' या लेखाच्या आधारे शिंपल्यांचे ढोबळ प्रकार सांगा.
४) 'अडुळसा' या वनस्पतीचे औषधी गुणधर्म लिहा.
५) 'चालत राहा' या कवितेत कवीने कोणता संदेश दिला आहे?

'प्रतिसादी वाचकवीर व्हा...' या प्रश्नावलीची उत्तरे पाठवलेल्या खालील सभासदांचे

✽ मन:पूर्वक अभिनंदन !!! ✽

चि. साहिल चौधरी (इ. ४ थी) नाशिक, **चि. निरंजन चिकणे** (इ. ८ वी) यवतमाळ, **कु. दुर्वा गायक**, गोवा, **कु. आचल वाकडे, कु. रूचिका मसराम, कु. गायत्री यादव, कु. शोभना कांबळे, कु. अंजली गोळघाटे, कु. अक्षता गुडधे,** (इ. ९ वी) भिडे गर्ल्स् हायस्कूल, नागपूर.

पान क्र. ८ वरील 'जरा डोकं चालवा'चे उत्तर – प्रत्येक चौरसामध्ये केंद्रभागी असलेल्या उभ्या स्तंभाच्या दोन्ही बाजूला समरूप असे आकृतिबंध आहेत. हा विचार करता दिलेल्या प्रश्नाचे उत्तर–आकृती F.

शब्द एक क्रियापदे अनेक

एकच शब्द पण त्याबरोबर वेगवेगळी क्रियापदे आली, की शब्दांचे अर्थ बदलत जातात. पुढे एक शब्द व काही क्रियापदे दिली आहेत. ते जोडून होणाऱ्या वाक्प्रचारांची वेगवेगळ्या अर्थांची वाक्ये तयार करा.

शब्द – नजर
क्रियापदे – लागणे, पडणे, टाकणे, असणे, देणे.
शब्द – तोंड
क्रियापदे – देणे, दाखविणे, टाकणे, फिरवणे, येणे.
शब्द – अंग
क्रियापदे – चोरणे, टाकणे, धरणे.

नोंद घ्या...

छात्र प्रबोधन – वर्गणीतील बदल

कागद, छपाई यांचे दर सातत्याने वाढत आहेत तरीदेखील गुणवत्तेत कोणतीही तडजोड न करता शक्य तेथे काटकसर करत गेली पाच वर्षे आपण वार्षिक वर्गणीत कोणताही बदल केला नाही. छात्र प्रबोधनची वाटचाल दीर्घकाळ चालू राहाण्यासाठी यापुढे वर्गणीतील वाढ अपरिहार्य आहे. **सौर अग्रहायण शके १९३६, डिसेंबर २०१४ पर्यंत आहे त्याच वर्गणीत तुम्ही पुढील वर्षासाठी सभासद होऊ शकाल.**

सौर पौष शके १९३६/जानेवारी २०१५ पासून मासिकाची वर्गणी खालीलप्रमाणे असेल
वार्षिक वर्गणी ₹ २००/–, द्वैवार्षिक – ₹ ४००/–, त्रैवार्षिक – ₹ ५५०/–, दशवार्षिक ₹ १७००/–

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० अग्रहायण, शके १९३६, १ डिसेंबर २०१४ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे –२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

खाली काही कल्पना दिलेल्या आहेत. तुम्हाला सुचायला थोडी मदत व्हावी; म्हणून त्यांची काही उत्तरेही दिलेली आहेत. प्रत्येक कल्पनेवर अजून किमान १० उत्तरं तरी तुम्हाला द्यायची आहेत. तुमची उत्तरं लवकरात लवकर 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. निवडक उत्तरांना प्रसिद्धी मिळेल. चला तर! **तुमच्या प्रतिभेला मुक्त विहरू द्या.**

तर काय होईल ??

टि. व्ही.चा शोध लागलाच नसता तर...

* वेळच वेळ उपलब्ध झाला असता.
* माणसा माणसातील संवाद वाढला असता.
* घरबसल्या मनोरंजनाचा पर्याय शोधावा लागला असता.
* जागतिक घडामोडी गावागावात पोहोचल्या नसत्या.

लोकपाल विधेयक अंमलात आले तर...

* भ्रष्टाचाराला काही प्रमाणात आळा बसेल.
* लाल फितीच्या प्रशासकीय कारभारावर अंकुश येऊन, कामे वेळच्यावेळी मार्गी लागतील.
* तात्काळ न्यायनिवाडा होईल.
* नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना वाढीस लागेल.



क्लोनिंगचा वापर सर्रास झाला तर...

* माणसाची 'स्व-ओळख' पुसली जाईल.
* कायदा व सुव्यवस्था राखणे अवघड जाईल.
* लोकसंख्येवर नियंत्रण राहणार नाही.
* संशोधन क्षेत्राला अधिक गती येईल.
* निसर्गाचा समतोल राखता येणार नाही.



भाषा-विषय अभ्यासक्रमात नसतील तर...

* अभिव्यक्ती विकसित होणार नाही.
* लेखनाचे कष्ट कमी होतील.
* साहित्याचा आनंद घेता येणार नाही.
* भाषा विषयाची रूची नसलेल्या विद्यार्थ्यांना आनंद होईल.
* भविष्यातील कवी-लेखकांची संख्या कमी होईल.

झाडे नसती तर...



* शुद्ध हवा मिळाली नसती.
* फळे/फुले मिळाली नसती.
* लाकूड उपलब्ध झाले नसते.
* कवींना कविता सुचल्या नसत्या.

सौर अग्रहायण, शके १९३६/डिसेंबर २०१४ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० अग्रहायण, शके १९३६ /१ डिसेंबर २०१४
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 / 2012 - 2014,
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक : WPP-21.Published & Posted at S.P. Post Office On 1st of Every Month

सौर दिनदर्शिका
शके १९३६

	डिसेंबर २०१४	अग्रहायण पौष
सो.	1	१०
मं.	2	११
बु.	3	१२
गु.	4	१३
शु.	5	१४
श.	6	१५
र.	7	१६
सो.	8	१७
मं.	9	१८
बु.	10	१९
गु.	11	२०
शु.	12	२१
श.	13	२२
र.	14	२३
सो.	15	२४
मं.	16	२५
बु.	17	२६
गु.	18	२७
शु.	19	२८
श.	20	२९
र.	21	३०
सो.	22	पौ. १
मं.	23	२
बु.	24	३
गु.	25	४
शु.	26	५
श.	27	६
र.	28	७
सो.	29	८
मं.	30	९
बु.	31	१०

संदर्भ : अंकातील पृष्ठ क्रमांक १३ वरील 'सागर शिंपले' हा माहितीपर लेख (वरील प्रकाशचित्रे - सौजन्य इंटरनेट)

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ १५/-
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -